www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक ३६ ■ पृष्ठे - ०६ ■ ठाणे, बुधवार, १२ जून २०२४ ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ■ रु.२/-

## थोडक्यात



### सैन्य दलासाठी आता टेलिमानस हेल्पलाईन विशेष कक्ष

● मुंबई, विशाल कारंडे :

सशस्त्र दलांतील कर्मचाऱ्यांना सातत्याने तणावग्रस्त परिस्थितीला सामोरे जावे लागते. सीमा परिसरातील बदलत्या घडामोडींमुळे ते अनेकदा तणावाखाली वावरत असतात. याचा परिणाम त्यांच्या कुटुंबियांवरही होत असतो. त्यामुळे त्यांना मानसिक उपचारांची आवश्यकता असते. ही बाब लक्षात घेऊन पुणे येथील सशस्त्र सेना वैद्यकीय महाविद्यालयाने सैन्य दलातील कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांच्या मानसिक आरोग्यविषयक समस्यांचे निराकरण करण्यासाठी स्वतंत्र टेलिमानस कक्षाची स्थापना केली आहे. सैन्य दलातील जवान, अधिकारी व त्यांच्या कुटुंबियांना या कक्षाचा लाभ होणार आहे. पुण्यातील सशस्त्र सेना वैद्यकीय महाविद्यालयामध्ये दोन वर्षांच्या कालावधीसाठी, पथदर्शी प्रकल्प, राष्ट्रीय टेलिमेंटल हेल्थ हेल्पलाइन 'टेलिमानस'चा विशेष कक्ष चालविण्यासाठी आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय आणि संरक्षण मंत्रालय यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला आहे. पुण्यातील सशस्त्र सेना वैद्यकीय महाविद्यालयात सुरू करण्यात आलेल्या या विशेष टेलिमानस कक्षाचे उद्घाटन चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ जनरल अनिल चौहान यांच्या हस्ते करण्यात आले. सदैव कारवाईसाठी सज्ज, प्रादेशिक संघर्षातून येणारा तणाव यामुळे सातत्याने त्यांना तणावग्रस्त परिस्थितीला सामोरे जावे लागते.

पान २ वर

## रायगडात जलप्रवासी वाहतुकीच्या कक्षा रुंदावणार, काशिद पाठोपाठ दिघी येथे रो-रो जेटीचे बांधकाम सुरु होणार



● अलिबाग, दिगंबर जाधव :

> "करोना काळात काशिद येथील जेटीचे काम खडले होते. मात्र आता ते मार्गी लागले आहे. ब्रेक वॉटर बंधाऱ्याचे काम पूर्ण झाले आहे. जेटीची व वाहनतळाची उर्वरीत कामे पावसाळ्यानंतर पूर्ण केली जातील. पुढील वर्षापासून काशिदपर्यंत रो रो सेवा सुरू करता येऊ शकेल. दिघी येथील जेटीचे कामही लवकरच सुरु होईल. -सुधीर देवरे, मुख्य कार्यकारी अभियंता, मेरीटाईम बोर्ड

मुंबईतील भाऊचा धक्का ते मांडवा दरम्यान सध्या (गेल ऑन गेल ऑफ) रोरो जलप्रवासी वाहतूक केली जाते. आगामी काळात या जलप्रवासी वाहतुकीच्या कक्षा श्रीवर्धन तालुक्यापर्यंत रुंदावणार आहेत. मुरुड तालुक्यातील काशिद पाठोपाठ श्रीवर्धन तालुक्यातील दिघी येथे रोरो सेवेसाठी सुसज्ज जेटी उभारण्याचे काम हाती घेतले जाणार आहे. चार वर्षापूर्वी मुंबईतील भाऊचा धक्का ते अलिबाग तालुक्यातील मांडव्या दरम्यान रो रो सेवा सुरु करण्यात आली होती. या जल प्रवासी वाहतूक सेवेमुळे मुंबईतून अलिबागला येणाऱ्या पर्यटकांना आपली वाहने बोटीतून आणण्याची सुविधा उपलब्ध झाली. भाऊचा धक्का ते मांडवा हे अंतर अवघ्या ५० मिनटात पार करणे शक्य झाले. यामुळे इंधन आणि वेळेची बचत होण्यास मदत झाली. प्रवाश्यांचा या सेवेला लाभलेला प्रतिसाद लक्षात घेऊन आता मुरुड आणि श्रीवर्धन तालुक्यांना रो रो जलप्रवासी सेवेनी जोडण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

पान २ वर

# पाऊले चालती पंढरीची वाट..!

### आषाढी यात्रेसाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातुन एसटीच्या ५ हजार बसेस धावणार





● ठाणे, यश सावंत:

आषाढी यात्रेनिमित्त विठू नामाचा जयघोष करीत श्री क्षेत्र पंढरपुरला जाणाऱ्या भाविक प्रवाशांसाठी एसटीने यात्राकाळात ५ हजार विशेष बस सोडण्याचे नियोजन केले आहे. विशेष म्हणजे यंदा राज्यातील कोणत्याही गावातून ४० अथवा त्या पेक्षा जास्त भाविक प्रवाशांनी एकत्रित मागणी केल्यास त्यांना थेट पंढरपूरला जाण्यासाठी त्यांच्या गावातून एसटी बस उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी भाविक प्रवाशांनी आपल्या जवळच्या आगारात संपर्क साधावा असे आवाहन एसटी महामंडळातर्फे करण्यात आले आहे. सालाबाद प्रमाणे श्री क्षेत्र पंढरपूर येथे आषाढी एकादशीला राज्यभरातून लाखो भाविक-प्रवाशी येतात. पान २ वर

## पुण्यातील नालेसफाईच्या कामाची एसआयटी मार्फत चौकशी व्हावी; खासदार सुप्रिया सुळेंची मागणी

● पुणे, अभिजित येरल्लू :

शहरात पावसाळीपूर्व कामे करताना नालेसफाई व अन्य कामांसाठी ११ कोटींच्या निविदा काढण्यात आल्या. पण कामे का झाली नाही. पुणे शहर का तुंबले, असा प्रश्न विचारत खासदार सुप्रिया सुळे यांनी मंगळवारी महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र देशमुख यांना धारेवर धरले. तसेच या कामांची एसआयटीमार्फत चौकशी करावी अशी मागणी केली. दरम्यान येत्या आठ दिवसात ही कामे झाली नाही तर तीव्र आंदोलनाचा इशारा खासदार सुळे यांनी आयुक्तांना दिला.



यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, माजी नगरसेवक विशाल तांबे, ॲड निलेश निकम आदी उपस्थित होते.

खासदार सुळे यांनी पत्रकारांशी बोलताना घाईत केलेल्या विकास कामामुळे हे प्रश्न निर्माण झाले असल्याचा आरोप केला. आम्ही आयुक्तांना आठ दिवसांचा वेळ दिला आहे. तसेच या कामामध्ये आमची काही मदत लागली तरी सांगा असेही सांगितले आहे. येत्या २१ तारखेला पुन्हा या प्रश्नी आयुक्तांची भेट घेणार असून, शहरातील नालेसफाई व पाणी तुंबण्याचे प्रकार थांबले नाहीत तर रस्त्यावर उतरू असेही त्यांनी सांगितले.

आज आम्ही पाणी साचलेल्या भागात पाहणी केली. यात नाल्यावरून रस्ते केलेले आढळून आले. यात पाण्याचे आउटलेट बंद असल्याचे दिसून आले. ५० ठिकाणी नाले ब्लॉक केले गेले आहेत. रस्त्यांची लेव्हल चुकली आहे. नालेसफाई करण्यात जो ठेकेदार कामचुकारपणा करतो त्यावर महापालिका प्रशासनाने कारवाई का केली नाही.

पान २ वर

## भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डांचा कार्यकाळ संपला; लवकरच राष्ट्रीय अध्यक्षाची निवड होणार

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

लोकसभा निवडणुकीनंतर आता भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षाबाबत मोठी बातमी समोर आली आहे. अध्यक्षपदाची निवडणूक सप्टेंबरपर्यंत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नवीन अध्यक्षाची नियुक्ती होईपर्यंत जेपी नड्डा अध्यक्षपदी राहतील, असे सांगण्यात येत आहे. म्हणजेच, आगामी चार महिन्यांसाठी जेपी नड्डाच्या खांद्यावर आरोग्य मंत्रालयासह पक्षाची धुरा असणार आहे. जेपी नड्डा यांची जानेवारी 2020 मध्ये भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाली. त्यांचा अध्यक्षपदाचा कार्यकाळ जानेवारी 2023 मध्ये संपला,



पण लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर त्यांना जून 2024 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. आता नड्डांची केंद्रीय मंत्रिमंडळात वर्णी लागल्यामुळे पक्षाला लवकरच दुसरा पूर्णवेळ अध्यक्ष पाहावा लागणार आहे. अध्यक्षपदाच्या शर्यतीत ही नावे नड्डा मंत्रिमंडळात सामील झाल्यानंतर भाजपला नवा अध्यक्ष मिळणार हे निश्चित मानले जात आहे. मात्र, या शर्यतीत अनेकांची नावे आहेत.

पान २ वर

## बनावट बातमी कात्रण करणाऱ्यांना शोधून गुन्हा दाखल करण्याची मागणी

● मीरारोड, विशाल पाटील :

भाजपाचे मीरा भाईंदर निवडणूक प्रमुख ॲड . रवी व्यास हे पुन्हा स्वगृही जाणार अश्या आशयाची वृत्तपत्रात बातमी आल्याचे बनावट बातमी कात्रण समाज माध्यमांवर व्हायरल करणाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी व्यास यांनी मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तांना केली आहे.

बनावट बातमी कात्रणचा वापर करण्याची ही पहिलीच घटना शहरातील आहे.

ॲड. व्यास हे पुन्हा स्वगृही जाणार आशय आशयाची समाज माध्यमांवर एखाद्या वृत्तपत्रात बातमी छापून आली असल्यागत त्याचे बनावट कात्रण व्हायरल केले गेले आहे. व्यास यांच्या पक्षांतर्गत वा बाहेरच्या विरोधकांनी हा कटकारस्थान करून प्रकार केल्याचा संशय व्यास समर्थकांना आहे . ॲड . व्यास यांनी पोलीस आयुक्त मधुकर पांडेय यांना केलेल्या तक्रारीत म्हटले






आहे की, माझी राष्ट्रवादी पार्टीमध्ये बैठक सुरु आहे व मी राष्ट्रवादीमध्ये प्रवेश करीत आहे अशा आशयाची बातमीचे कात्रण व्हायरल केले गेल्याचे निदर्शनास आले . मी भारतीय जनता पार्टीचा कट्टर व निष्ठावंत कार्यकर्ता आहे. गेल्या १० ते ११ वर्षापासुन भाजपात नगरसेवक, जिल्हा महामंत्री, जिल्हा अध्यक्ष अशा वेगवेगळे पदावरती कामे केलेली आहेत. सध्या पक्षाचा १४५ विधानसभा निवडणूक प्रमुख आहे . पान २ वर

## धक्कादायक..! नागपूर महापालिका म्हणते एकाही जीर्ण इमारतीवर जाहिरात फलक नाही

● नागपूर, नितीन देवळेकर :

मुंबईतील जाहिरात फलक पडून अनेकांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. त्यानंतर नागपूर शहरातीलही अनधिकृत जाहिरात फलकांचा मुद्दा प्रकाशात आला. परंतु शहरात एकाही जीर्ण इमारतीवर जाहिरात फलक नाही, असे धक्कादायक उत्तर महापालिकेने माहितीच्या अधिकारात दिले आहे.

मुंबईतील घाटकोपर येथील पेट्रोल पंपावर वादळामुळे कोसळलेल्या महाकाय फलकाखाली दबून १७ जणांचा मृत्यू झाला.



या घटनेनंतर नागपुरातीलही मोठ्या जाहिरात फलकांचा प्रश्न ऐरणीवर आला. दरम्यान, महापालिकेकडूनही शहरातील बेकायदेशीर फलकांविरोधात विशेष मोहीम राबवली गेली. यावेळी जीर्ण इमारतीवरील जाहिरात फलकही हटवले गेले. या घटनेनंतर सामाजिक कार्यकर्त्यांनी महापालिकेकडे शहरातील जाहिरात फलकांबाबत माहितीच्या अधिकारातून काही माहिती घेतली. नागपूर शहरात १ जानेवारी २०२१ ते १५ मे २०२४ दरम्यान महापालिकेने जीर्ण ठरवलेल्या इमारतींवर किती लोकांनी किंवा एजेन्सीने बेकायदेशिररित्या जाहिरात फलक लावले, या प्रश्नावर महापालिकेने निरंक असे उत्तर दिले आहे. तसेच शहरात वादळी वाऱ्यासह पावसामुळे एकही जाहिरात फलक पडल्याचे दिसले नाही, असे महापालिकेने म्हटले आहे. तिसऱ्या उत्तरात संपूर्ण शहरात बेकायदेशीर फलक लावलेले केवळ तीन आकाशचिन्हं महापालिकेला आढळल्याचे सांगण्यात आले आहे. महापालिकेने शहरात केवळ १६६ आकाशचिन्ह फलकांनाच परवानगी दिल्याची माहिती दिली. त्यामुळे शहरात इतके कमी फलक आहेत का, हा प्रश्नही उपस्थित झाला आहे.

महापालिका कायद्यातील कलम २४४ व २४५ अन्वये जाहिरात एजन्सीला परवानगी देण्याचा अधिकार महापालिकेला आहे. परवानगी घेताना जाहिरात एजन्सीने महापालिकाकडे शुल्क भरणे आवश्यक आहे. शिवाय जाहिरातीचा आकार व कालमर्यादा फलकावर नमूद करणे गरजेचे आहे. मात्र याकडे दुर्लक्ष होते आणि महापालिकेकडून कारवाई केली जात नाही.

## लोकसभा निवडणुकीतल्या विजयानंतर नरेश मस्कें यांनी घेतली राज साहेबांची भेट

● ठाणे, रोहित जैसवाल :

शिवसेनेचे नेते नरेश मस्के यांचा लोकसभा निवडणुकीत विजय झाला आहे. दरम्यान खासदार झाल्यानंतर त्यांनी मनसेप्रमुख राज ठाकरे यांना एक भावनिक पत्र लिहीलं आहे. 'विद्यार्थी दशेपासून ज्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचा आदर्श समोर ठेवत मी शिवसेनेच्या कामाला सुरुवात केली विद्यार्थी सेनेचे काम करत असताना साहेबच आमचे बॉस होते,' असं मस्के यांनी म्हटलं आहे. विद्यार्थी दशेपासून ज्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचा आदर्श समोर ठेवत मी शिवसेनेच्या



कामाला सुरुवात केली विद्यार्थी सेनेचे काम करत असताना साहेबच आमचे बॉस होते. या निवडणुकीत मला उमेदवारी घोषित झाल्यानंतर राज साहेबांना भेटायला गेलो आणि त्यांचे आशीर्वाद घेऊन प्रचाराला सुरुवात केली. त्यांनी खास माझ्यासाठी आणि डॉक्टर श्रीकांत शिंदे यांच्यासाठी ठाण्यात सभा ही घेतली त्या सभेला उदंड प्रतिसाद मिळाला.

साहेबांचे भाषण हे संपूर्ण देशाचं आकर्षण बिंदू असतं त्या सभेने आम्हाला जिंकून येण्याचा मोठा आत्मविश्वास दिला सभा संपल्यावर पाठीवर हात ठेवत त्यांनी आम्हाला शुभेच्छा दिल्या आणि त्याचं फलित आज समोर आहे. लोकसभा निवडणुकीतील विजयानंतर पुन्हा एकदा आशीर्वाद घेण्यासाठी मंगळवारी आदरणीय राज साहेबांची भेट घेतली सोबत माझे सगळे कार्यकर्ते आणि मनसेचे जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव हे सुद्धा होते. साहेबांनी दिलखुलास गप्पा मारत दिल्लीत गेलात म्हणजे मराठी माणसाला विसरू नका मराठी माणसाचा आवाज बुलंद करण्यासाठी तुम्हाला दिल्लीत पाठवलं आहे अशी दगराग्युक्त सूचना केली. त्यांची प्रत्येक सूचना आम्हाला मोलाची आहे राज साहेब मराठी माणसाचा आवाज तर आम्ही बुलंद करूच पण आपल्या या मातीतल्या माणसाचे जिव्हाळ्याचे प्रश्न समस्या आणि विषय यांना वाचा फोडण्याचं काम नक्कीच करू आणि तुमचा विश्वास सार्थ ठरवू, असे नरेश म्हस्के यांनी त्यांच्या पत्रात म्हटले आहे.

## अन्यथा सर्वपक्षीय नेत्यांच्या घरासमोर उपोषण! नाशिकच्या सकल मराठा समाजाचा इशारा

● नाशिक सचिन कदम :

मराठा समाजाच्या आरक्षणासह अन्य मागण्यांची पूर्तता करण्यासाठी सर्वपक्षीय प्रमुख नेत्यांनी पुढाकार घ्यावा अन्यथा, सर्व नेत्यांच्या घरासमोर उपोषणाला सुरुवात केली जाईल, असा इशारा सकल मराठा समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे. अंतरवली सराटी येथे मनोज जरांगे यांनी सुरू केलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर, नाशिक जिल्ह्यातील मराठा समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी यात कुठलेही राजकारण न



आणता जरांगे यांच्या जिवाशी खेळू नये, समाजाच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी ठोस पाऊले टाकावीत, असेही सूचित केले. राजकीय पक्षांच्या प्रमुखांनी पुढे येऊन पाठपुरावा केला पाहिजे. लोकसभा निवडणुकीत विजयी झालेल्या ४८ नवनिर्वाचित खासदारांनी याप्रश्री लोकसभेत आवाज उठविण्याची गरज आहे. आमदारांनी केवळ पाठिंबा वा फोटोसेशन न करता प्रत्यक्षात ठोस कृती करण्याची आवश्यकता आहे.

## संपादकीय

# दक्षिण आफ्रिकेतील 'निकाल'

विरोधी पक्ष 'डेमोक्रॅटिक अलायन्स'ला 21 टक्के तर एमके पक्षाला 11 टक्के मतं मिळाली. आघाडी करण्यात एएनसी यशस्वी झाला तरच राष्ट्राध्यक्ष सीरिल रामाफोसांची फेरनियुक्ती होईल. इंग्लंड, फ्रान्स, स्पेन वगैरे पाश्चात्य देशांनी आशिया आणि आफ्रिका खंडातील अनेक देशांना गुलाम केले होते. साम्राज्यवादी सत्तेच्या विरोधातील लढे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात वजनदार झाले आणि दुसरे महायुद्ध संपल्यानंतर आशियाA आफ्रिकेतील भारतासारख्या वसाहती स्वतंत्र झाल्या. भारतातील हा स्वातंत्र्य लढा मुख्यत्वेकरून काँग्रेसने लढवला. परिणामी भारतात नंतर सुरू झालेल्या संसदीय लोकशाहीत सुरुवातीची अनेक वर्षे म्हणजे 1947- A1977 दरम्यान काँग्रेस पक्ष सत्तेत होता. नंतर काँग्रेसचा प्रभाव ओसरत गेला. आज असेच काहीसे दक्षिण आफ्रिकेत होत असल्याचे दिसून येते.

28 मे 2024 रोजी तेथे झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांत आफ्रिकन नॅशनल काँग्रेस (एएनसी)ला पराभव पत्करावा लागत आहे. हा पक्ष तेथे 1994 सालापासून म्हणजे दक्षिण आफ्रिका स्वतंत्र होऊन लोकशाही शासनव्यवस्था सुरू झाल्यापासून सत्तेत आहे. आता मात्र या पक्षाला पायउतार व्हावे लागण्याची शक्यता आहे. सत्तेत राहावयाचे असेल तर या पक्षाला इतर समविचारी पक्षांशी आघाडी करावी लागेल. या निवडणुकांत एएनसीला फक्त 40 टक्के मते मिळाली आहेत. तेथेसुद्धा भारतासारखीच बहुपक्षीय लोकशाही आहे. दक्षिण आफ्रिकेची लोकसंख्या साडेसहा कोटी असून यात कृष्णवर्णीयाची संख्या सुमारे 80 टक्के आहे. तुलनाच करायची म्हटलं तर आफ्रिका खंडातील इतर देशांशी तुलना करता दक्षिण आफ्रिकेची आर्थिक स्थिती बरी असली तरी तेथेसुद्धा बेरोजगारीचा टक्का 32 एवढा आहे. बेरोजगारीची सर्वात जास्त झळ कृष्णवर्णीयांना बसत आहे आणि हा सामाजिक घटक एएनसी चा कट्टर समर्थक आहे. तेथील लोकसभेत एकूण 400 खासदार असतात. आता विसर्जित झालेल्या लोकसभेत एएनसीचे 230 खासदार, डेमोक्रॅटिक अलायन्सचे 84, तर इकॉनॉमिक फ्रीडम फायटरचे 44 आणि अपक्ष 42 होते. तेथे सुमारे 2 कोटी 80 लाख मतदार आहेत. फक्त 40 टक्के मतं मिळालेल्या एएनसीच्या नेत्यांनी इतर समविचारी पक्षांशी वाटाघाटी सुरू केल्या आहेत. (याच पक्षाला 2019 साली झालेल्या निवडणुकांत 58 टक्के मतं मिळाली होती) यातील काही पक्षांनी राष्ट्राध्यक्ष रामाफोसा यांनी राजीनामा दिला पाहिजे अशी अट घातली होती. पण एएनसीच्या नेत्यांनी ही मागणी अमान्य केली.

आफ्रिकन नॅशनल काँग्रेस ( स्थापनाः 1912) म्हणजे डॉ. नेल्सन मंडेलांचा पक्ष. या पक्षाने सुरुवातीपासूनच देशाच्या स्वातंत्र्यासाठी आणि देशातील वंशवादी धोरण समाप्त व्हावे यासाठी लढा दिला. सुरुवातीला हा पक्ष स्वातंत्र्यासाठी सर्व प्रकारची साधनं वापरत होता. एप्रिल 1960 मध्ये तेथील गौरवर्णीय सरकारने या पक्षावर बंदी घातली होती. परिणामी या पक्षाला गुप्तपणे राजकीय कारवाया कराव्या लागल्या होत्या. 1980च्या दशकाच्या मध्यावर दक्षिण आफ्रिकेतील गौरवर्णीय सरकारवर वंशवादी राजवट संपवण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरून दडपण यायला लागलं. गौरवर्णीय राष्ट्राध्यक्ष फ्रेडेरिक क्लार्क यांनी फेब्रुवारी 1990 मध्ये जाहीर केले की आमचे सरकार एएनसी वरची बंदी उठवत आहे. तेव्हापासून देशातील वातावरण बदलत गेले. यातूनच पुढे म्हणजे नोव्हेंबर 1993 मध्ये हंगामी राज्यघटना मान्य झाली आणि 27 एप्रिल 1994 रोजी तेथे पहिल्या सार्वत्रिक निवडणुका संपन्न झाल्या.

या निवडणुकांत एएनसीला 63 टक्के मतं मिळाली आणि हा पक्ष सत्तेत आला. तेव्हापासून आजपर्यंत हा पक्ष तेथे सत्तेत आहे. आता मात्र या पक्षाला सत्तेत राहावयाचे असेल तर इतर समविचारी पक्षांशी युती करावी लागेल. 1990च्या दशकात लोकप्रियतेच्या शिखरावर असलेल्या या पक्षाची अलीकडे घसरण सुरू झाल्याचे दिसत आहे. नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांत या पक्षाला पहिल्यांदाच 50 टक्क्यांपेक्षा कमी मतं मिळाली आहेत.

दक्षिण आफ्रिकेच्या राज्यघटनेनुसार तेथील मतदार थेट राष्ट्राध्यक्ष निवडत नाहीत. तेथे 'प्रमाणबद्ध प्रतिनिधित्व' हे तत्त्व महत्त्वाचे आहे. याचा अर्थ असा की पक्षाला जेवढे टक्के मतं मिळाली तेवढे त्या पक्षाचे खासदार लोकसभेत जातात. आपल्या भारतातील पद्धतीनुसार प्रत्येक मतदारसंघात निवडणूक होते आणि प्रत्येक ठिकाणी जास्तीत जास्त मतं मिळवणारा उमेदवार विजयी ठरतो. त्यामुळे आपल्या देशात पक्षाला एकूण मतं कमी पण त्या पक्षाचे खासदार जास्त, असे चित्र अनेकदा दिसते.

आता तेथील नव्या संसदेत पक्षीय बलाबल असे आहे की जर विद्यमान राष्ट्राध्यक्ष रामाफोसा यांना दुसऱ्यांदा राष्ट्राध्यक्ष व्हायचे असेल तर त्यांना किमान एका पक्षाशी हातमिळवणी करावी लागेल. यातील एक पक्ष म्हणजे एमके (स्थापनाः 2023). हा पक्ष माजी राष्ट्राध्यक्ष जेकब झुमा यांनी स्थापन केला आहे. या पक्षाने तर जाहीरच केले आहे की जर रामाफोसा यांना राष्ट्राध्यक्ष व्हायचं असेल तर आम्ही पाठिंबा देणार नाही. दक्षिण आफ्रिकेत आपल्या देशात आहेत तशी घटकA राज्ये आहेत आणि आपल्याकडे जशा विधानसभा निवडणुका होत असतात तसेच तेथे आहे.




## आजची चित्रोळी

जलें झिजविलें घासून घुसळून
सागरातल्या गिरी शिखराला !
मृदुल जलाची ताकद कळते
झिजवी कठीणशा दगडाला !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

## पान १ वरून...

### सैन्य दलासाठी आता टेलिमानस हेल्पलाईन...

त्यामुळे त्यांच्या उत्तम मानसिक आरोग्यासाठी कुटुंब कल्याण मंत्रालय आणि संरक्षण मंत्रालयाने पुणे येथील सशस्त्र सेना वैद्यकीय महाविद्यालयामध्ये टेलिमानसचा कक्ष स्थापन केला आहे. टेलिमानसच्या या स्वतंत्र कक्षामार्फत सशस्त्र दलातील कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांचे मानसिक आरोग्य आणि कल्याण याकडे लक्ष देण्याबरोबरच त्यांना मानसिक आरोग्यासंदर्भातील उपचारही त्वरित उपलब्ध केले जाणार आहेत. सैन्य दलासाठी समर्पित असलेल्या या टेलिमानस कक्षामुळे जवान आणि त्यांच्या कुटुंबियांना २४ तास महत्त्वपूर्ण मानसिक आरोग्य सहाय्य मिळण्यास मदत होणार आहे.

देशातील ३६ राज्यामंध्ये सुविधा उपलब्ध

प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशामध्ये मानसिक आरोग्य सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यासाठी १४४१६ हा टोल-फ्री क्रमांक उपलब्ध करण्यात आला आहे. सध्या सर्व ३६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये ५१ टेलिमानस कक्ष कार्यान्वित आहेत.

### रायगडात जलप्रवासी वाहतुकीच्या कक्षा...

सागरमाला योजने अंतर्गत काशिद येथे रो रो जेटी. टर्मिनल, वाहनतळ, ब्रेक वॉटर बंधारा उभारण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. यापैकी ब्रेक वॉटर बंधारा उभारणीचे काम पूर्ण झाले असून, जेटीचे काम पुढील चार महिन्यात पूर्ण होणे अपेक्षित आहे. जानेवारी २०२५ पासून या टर्मिनल मधून प्रत्यक्ष प्रवासी वाहतुक सुरू करण्याचे नियोजन आहे. या जेटी मुळे मुंबई ते काशिद हे अंतर अवघ्या दोन तासात पूर्ण होऊ शकणार आहे. यासाठी जवळपास दिडशे कोटींचा निधी खर्च होणार आहे.

काशिद पाठोपाठ आता श्रीवर्धन तालुक्यातील दिघी येथेही रो रो जेटीचे बांधकाम करण्याचा निर्णय मेरीटाईम बोर्डाने घेतला आहे. यासाठी ८८ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असून, लवकरच या कामाल सुरुवात होण्याची शक्यता आहे. या जेटीमुळे मुंबईतून थेट श्रीवर्धन पर्यंत रो रो सेवा उपलब्ध होऊ शकणार आहे. यामुळे मुंबई ते श्रीवर्धन पर्यंतचा प्रवास वेळ निम्यावर येणार आहे. अवघ्या अडीच ते तीन तासात मुंबईतून श्रीवर्धन पर्यंत पोहोचणे शक्य होणार आहे. या रोरो सेवेमुळे कोकणातील पर्यटनाला मोठी चालना मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### पाऊले चालती पंढरीची वाट..!

अनेक प्रवाशी स्वत:च्या खाजगी वाहनाने, रेल्वेने, एसटीने अथवा विविध पालखीं बरोबर चालत दिंडीने येतात या प्रवाशांना एसटीने यंदापासून थेट गाव ते पंढरपूर अशी बस सेवा उपलब्ध करून दिली आहे.४० पेक्षा जास्त भाविक प्रवाशांची संख्या असल्यास त्यांना त्यांच्या गावापासून विशेष बस उपलब्ध करून दिली जाणार आहे. अर्थात या प्रवासात देखील ७५ वर्षावरील ज्येष्ठांना मोफत प्रवास देणारी अमृत ज्येष्ठ नागरिक योजना, महिलांसाठी ५० टक्के तिकिट दरात सुट देणारी महिला सन्मान योजना यासारख्या शासनाने दिलेल्या सर्व सवलती लागू राहणार आहेत मागील वर्षी एसटीने आषाढी यात्रे निमित्त ४२४५ विशेष बसेस सोडल्या होत्या. याव्दारे यात्रा काळामध्ये १८ लाख, ३० हजार, ९३४ भाविक प्रवाशांची सुखरूप ने-आन एसटीने केली होती

यात्रा काळामध्ये गर्दीचा फायदा घेऊन तिकीट न काढणे, वाहकाकडून तिकीट मागून न घेणे अशाप्रकारे फुकट प्रवास करू इच्छिणाऱ्या प्रवाशांना लगाम घालण्यासाठी एसटीने पंढरपूरला जाणाऱ्या विविध मार्गावर १२ ठिकाणी तपासणी नाके उभारण्याचे नियोजन केले आहे अशा फुकटया प्रवाशांना अटकाव करण्यासाठी एसटीचे २०० सुरक्षा कर्मचारी व अधिकारी यात्रा काळात २४ तास नजर ठेवून असणार आहेत

वाहतूकीच्या नियोजनासाठी एसटीची मदत

एकादशीच्या दिवशी लाखो भाविक प्रवासी आपल्या गावाकडे मार्गस्थ होतात अशा वेळी रस्त्यावर वाहतूक कोंडी होऊन प्रवासाचा खोळंबा होतो यंदा स्थानिक पोलीस प्रशासनाच्या खांदयाला खांदा लावून 36 पेक्षा जास्त वाहतूक नियंत्रक व सुरक्षा रक्षक वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी काम करणार आहेत. त्यामुळे रस्त्यावरील वाहतूक सुरळीत होण्यासाठी पोलीस प्रशासनाला एसटीची मदत होणार आहे

चार तात्पूर्ती बस स्थानके उभारणार

पंढरपूर यात्रेसाठी राज्यभरातील लाखो भाविकांसाठी विविध विभागांतून गाड्या सोडण्यात येणार आहेत. वारकरी, भाविक तसेच पर्यटकांची होणारी गर्दी पाहता एकाच स्थानकावर गर्दी होऊ नये यासाठी प्रवाशांच्या सोयीसाठी यात्रा कालावधीत पंढरपूर येथे चंद्रभागा, भिमा, पांडुरंग (आयटीआय कॉलेज) व विठ्ठल कारखाना यात्रा स्थानक अशी चार तात्पुरती बस स्थानके उभारण्यात येणार आहेत. दरम्यान, यात्रा काळात बसस्थानकावर पिण्याचे पाणी, सुलभ शौचालय, संगणकीय आरक्षण केंद्र, चौकशी कक्ष, मार्गदर्शन फलक... अशा विविध सोयी-सुविधा पुरविण्यात येणार असून जास्तीत जास्त भाविक-प्रवाशांनी, एसटीच्या सुरक्षित प्रवासी सेवेचा लाभ घ्यावा, असे आवाहन एसटी महामंडळ प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### पुण्यातील नालेसफाईच्या कामाची एसआयटी...

पुणे-सातारा रस्त्याच्या कामात हलगर्जीपणा करणाऱ्या ठेकेदाराला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी ब्लॅक लिस्ट केले तसे महापालिका का कोणावर कारवाई करीत नाही, याचा जाब सुळे यांनी विचारला.

पुणे शहरात गुन्हेगारी, ड्रग्स इशू वाढतायेत. शहरातील क्राईम रोज वाढत आहे. एका पावसात पुणेकरांची वाईट अवस्था झालीये. सगळया वाईट गोष्टी पुण्यातच का घडतात. याविषयी मी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिणार आहे. याला सर्वस्वी राज्य सरकार जबाबदार असल्याचा आरोप सुळे यांनी केला. पुण्यातून कंपन्या बाहेर चालल्या आहेत. उदय सामंत हे नाकारत असले तरी याचा देत माझ्याकडे उपलब्ध आहे. मी जे बोलते ते प्रामाणिकपणे बोलते असेही त्यांनी सांगितले. नीट परीक्षेमध्ये गोंधळ हा आश्चर्यकारक आहे. हा विद्यार्थ्यांच्या भवितव्याचा प्रश्न आहे. मी त्याचा निषेध करते. असेही सुळे यांनी सांगितले.

### भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डांचा...

यातील एक नाव म्हणजे विनोद तावडे. तावडे हे भाजपचे सरचिटणीस आहेत. महाराष्ट्र सरकारमध्ये मंत्री राहिलेले तावडे हे बीएल संतोष यांच्यानंतरचे सर्वात प्रभावी सरचिटणीस मानले जातात. याशिवाय, भाजप ओबीसी मोर्चाचे प्रमुख के लक्ष्मण यांचेही नाव या शर्यतीत आहे. लक्ष्मण तेलंगणातील असून, सध्या भाजपचे या राज्यावर विशेष लक्ष आहे. विशेष म्हणजे, सुनील बन्सल यांचेही नाव या शर्यतीत आहे. सध्या ते पश्चिम बंगाल, तेलंगणा आणि ओडिशा या तीन राज्यांचे प्रभारी आहेत.

### बनावट बातमी कात्रण करणाऱ्यांना शोधून...

महाराष्ट्रात लवकरच विधानसभाचे निवडणूक लागणार असून काही काही राजकीय विरोधक, समाजकंटक व गुन्हेगार प्रवृत्तीच्या लोकांनी प्रसारमाध्यमांद्वारे माझ्याविरुद्ध खोटे व बदनामीकारक बातमीचे कात्रण बनवून वायरल केले आहे.

जाणूनबुजून माहिती तंत्रज्ञानचा गैरवापर करुन खोटी बातमी पसरवून नागरीकांमध्ये चुकीचा संदेश जाऊन समाजात बदनामी व मानहानी केली आहे . सदर प्रकरणाची तात्काळ चौकशी करुन कटकारस्थान रचणाऱ्यांचा शोध घेऊन गुन्हा दाखल करण्याची मागणी ॲड . रवी व्यास यांनी केली आहे .

### अन्यथा सर्वपक्षीय नेत्यांच्या घरासमोर...

लोकसभा निवडणुकीनंतर मराठा समाजाच्या प्रश्नांबाबत पवार यांनी पुढाकार घेण्याची मागणी पुढे आली. या संदर्भातील प्रश्नावर पवार हे राज्यातील ज्येष्ठ नेते असून त्यांनी समाजाला न्याय मिळवून द्यावा. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही पुढाकार घेऊन प्रामाणिक प्रयत्न करावेत, अशी अपेक्षा करण गायकर यांनी व्यक्त केली. राजकीय पातळीवरील प्रतिसादाची काही दिवस प्रतिक्षा केली जाईल. नंतर शरद पवार यांच्या घरासमोर पहिले उपोषण केले जाणार आहे. पाठोपाठ अन्य राजकीय नेत्यांच्या घरासमोर हाच मार्ग अवलंबला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अंतरवली सराटी येथील आंदोलनास ग्रामसभेत ठराव होऊन परवानगी मिळाल्याचा दावा करण्यात आला.

याआधी सर्व राजकीय पक्षांचे नेते अंतरवली सराटी येथे गेले होते. प्रमुख राजकीय पक्षांच्या नेत्यांची भूमिका महाराष्ट्राला कळणे आवश्यक आहे. लोकसभा निवडणुकीत कोणी कोणाचा कार्यक्रम केला हे दिसले. गतवेळी राज्य सरकारने पत्रातून जे आश्वासन दिले, त्याची अमलबजावणी केली नाही. त्यामुळे आमची फसवणूक झाली. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी आत्मपरीक्षण करावे. अजून वेळ गेलेली नाही. लोकसभा निवडणुकीत सत्ताधाऱ्यांना फटका बसला की नाही, हे आम्ही सांगणार नाही. सर्व राजकीय पक्षाच्या नेत्यांनी एकत्र येऊन मनोज जरांगे यांच्या मागण्या पूर्ण कराव्यात, अशी मागणी गायकर यांनी केली.

# पनवेलकरांनो साथरोग- किटकजन्य आजार टाळण्याकरिता आरोग्याची काळजी घ्या- महापालिका आयुक्त चितळे

● पनवेल, भावना जैन :

पावसाळ्यात पनवेलमध्ये किटकजन्य आजाराच्या रुग्णांमध्ये वाढ होत असल्याने नागरिकांनी साथरोग-किटकजन्य आजार टाळण्याकरिता काळजी घेण्याचे आवाहन पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे. पालिकेमार्फत पावसाळ्यात नागरिकांनी घ्यायाच्या खबरदारी विषयी जनजागृती विविध माध्यमांतून करण्यात येत असून नागरिकांनी पालिकेने दिलेल्या सूचनांचे पाळल्यास आजारांवर वेळीच प्रतिबंध करता येईल असे आरोग्य विभागाने आवाहन केले आहे. पनवेलमध्ये सध्या तापाची साथ आहे. तीन ते चार दिवस ताप रुग्णांना येत असल्याने खासगी दवाखान्यांमध्ये गर्दी आहे. पनवेल महापालिकेच्या दवाखान्यात तापावर उपचार घेण्यासाठी रुग्ण जात आहेत. पालिकेच्या आरोग्य विभागाने हा व्हायरल ताप असून घाबरुन न जाता रुग्णांनी ताप आल्यास नजीकच्या पालिकेच्या दवाखान्यात जाण्याचे आवाहन केले आहे. पालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. गोसावी यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे पालिकेने स्वच्छता निरिक्षक, आरटी कामगार, एनपीडब्ल्यू यांच्या मार्फत घरोघरी भेट देऊन ताप व साथरोगाचे रुग्ण आहेत का याची माहिती घेऊन त्याद्वारे पालिकेचे आरोग्य विभागात रुग्ण शोधून त्यांच्यापर्यंत उपचार देत असल्याची माहिती दिली.

पालिका कोणत्या परिसरात कोणते कीटक जास्त आढळतात याचे सुद्धा सर्वेक्षण करत आहे. या सर्वेक्षणातून कोणत्या परिसरात डेंग्यू व मलेरियाचा फैलाव करणारे डास आढळतात त्याची माहिती पालिकेकडे जमा होईल. पालिकेने यासाठी संशोधकांची नेमणूक केली होती. या संशोधकांनी दिलेल्या अहवालानूसार पनवेल महापालिका क्षेत्रात मलेरीयाचा फैलाव करणाऱ्या डासांची संख्या अधिक असल्याचे या संशोधकांनी केलेल्या सर्वेक्षणात समोर आले. पालिका डासांच्या उत्पत्तीसाठी परिसरात धूरफवारणी व इतर प्रतिबंधित उपाययोजना केल्याचा दावा पालिकेच्या वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. गोसावी यांनी केला आहे. नागरिकांनी सुदृढ राहण्यासाठी काय करावे इमारतीतील पाण्याची टाकी निर्जंतुक करावी, पाणी उखळून व गाळून प्या, पालेभाज्या, फळे धुवूनच खावीत, कचरा घंटागाडीतच टाकावा, परिसर स्वच्छ ठेवावा, डासांची उत्पत्ती थांबविण्यासाठी साचलेले व डबक्यांमधील पाण्याचा निचरा होण्यासाठी सोय करावी, शिळे व उघड्यावरचे अन्नपदार्थ खाऊ नयेत, जेवणापूर्वी व शौचास जाऊन आल्यानंतर हात साबणाने स्वच्छ धुणे, पुर्ण शिजवेले, ताजे अन्न खावे, फुलदाणी मनीप्लँट,वॉटरकूलर इत्यादीमधील पाणी आठवड्यातून एक वेळा पुर्णपणे काढून कोरडे करून कोरडा दिवस पाळावा.

# मोदींना इतर राजकारण्यांच्या पातळीवर आणून ठेवले आहे

२०२४ ची सार्वत्रिक निवडणूक खरोखरच अद्भुत होती. वातावरणात भरून राहिलेली निराशा, हुकूमशाहीची घुसमटून टाकणारी सावली आणि धार्मिक तेढीची मळमळ या क्षणी तरी नाहीशी झाली आहे. आता कदाचित एनडीए तिसऱ्यांदा सरकार स्थापन करू शकते. ही निवडणूक काही नेहमीसारखी सामान्य निवडणूक नव्हती. राजकीय व्यवस्था कायम राहील का ही शक्यताच धोक्यात आली होती. निवडणुकीच्या निकालांनी पंतप्रधान मोदींच्या वरचष्म्याचा फुगा फोडला आहे. आपले काम, आपली बलाढ्य ताकद, सर्वज्ञता यांचा बोलबाला आणि आपल्या विचारसरणीचा आग्रह या सगळ्यातून त्यांनी ही निवडणूक स्वतःभोवती केंद्रित करत नेली होती. पण आता या क्षणी मोदी हे इतिहास घडवणारे नेते नाहीत की लोकांच्या मनात त्यांच्याबद्दल दैवत आहेत, ही भावना नाही. आज ते इतर इतर सगळ्या राजकारण्यांसारखेच एक राजकारणी आहेत. लोकांनीच त्यांना या पातळीवर नेऊन ठेवले आहे.

भारतीय राजकारणातील अनेक पैलूंची मूलगामी पुनर्रचना होणे आवश्यक आहे, हे या निवडणुकीने अधोरेखित केले आहे. उदाहरणार्थ, तिने साधलेले वेगवेगळ्या राजकीय पक्षांचे सत्तासंतुलन. निवडणुकीचा या पद्धतीचा निकाल आला नसता तर देशात भाजपचे अनियंत्रित वर्चस्व निर्माण झाले असते. या वर्चस्वामध्ये सगळ्या राजकीय शक्यता संपुष्टात आणण्याची, सगळ्या विरोधकांना गिळंकृत करण्याची आणि सुसंस्कृत नागरी समाजाचे भाजपच्या वसाहतीत रुपांतर होण्याची शक्यता दडलेली होती. देशात आता पुन्हा एकदा नीट स्पर्धात्मक राजकीय व्यवस्था उभी राहू शकते. त्यामधून सत्तासमतोल साधला जाऊ शकतो. हा समतोल काही प्रमाणात इंडिया आघाडीमुळे, विशेषतः उत्तर प्रदेशात विस्मयकारक ठरला. भाजपने राष्ट्रीय पातळीवरील आपली मतांची टक्केवारी राखली आहे, पण जागा गमावल्या आहेत. इंडिया आघाडी एकत्र राहिल्यास ती गंभीर अशी कायमस्वरूपी पर्यायी राजकीय ताकद बनू शकते. TINA (देअर इज नो अल्टरनेटिव्ह म्हणजेच कोणताही पर्याय नाही) हा मुद्दाही आता उरलेला नाही.

विरोधी पक्षांना सरकारकडून सातत्याने लक्ष्य केले जात होते, माध्यमांची साथ नव्हती आणि निवडणुकीच्या काळात सतत विरोधी पक्षांबाबत संशय निर्माण केला जात होता. अशा सगळ्या वातावरणातही लढत राहिलेल्या विरोधी पक्षनेत्यांच्या दृढनिश्चयाला चिकाटीला हा लोकांनी केलेला सलाम आहे असे म्हटले पाहिजे. आपल्याबद्दल संशय निर्माण करणारे कसे चुकीचे आहेत, हे सिद्ध करणे, आघाडी करणे आणि लोकांची मते आपल्याकडे वळवणे यासाठी राहुल गांधी आणि अखिलेश यादव यांना पैकीच्या पैकी गुण दिले पाहिजेत. लोकशाहीला धोका, संस्थात्मक अधःपतन आणि संविधानाला धोका या मुद्द्यांवर ही निवडणूक लढवली गेली. राजकारण अधिक संतुलित असेल तर त्यातून संस्थात्मक पुनर्स्थापना होण्याचीही शक्यता असते. स्पर्धात्मक राजकीय वातावरणात नागरी समाज आणि स्वतंत्र संस्थांनाही बळ मिळते. अशा वातावरणात सामान्य माणसाला दुबळे बनवणारे खोटे सामाजिक एकमत तयार करणे कठीण ठरते. आता उत्तर प्रदेशात भाजपने निम्म्या जागा गमावल्या आहेत या वस्तुस्थितीमुळे पक्षांतर्गत वाद आणि मतभेदांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. आता पक्षातच अधिक वाटाघाटी व्हायला लागतील. मोदी त्या वाटाघाटींसाठी सक्षम आहेत का हा मुख्य प्रश्न आहे. १९८९ ते २०१४ दरम्यान आपण पाहिले होते की त्या काळातील राजकारणात युती आणि काही किमान मुद्द्यांवर एकमत आवश्यक होते. आपण पुन्हा एकदा त्याच परिस्थितीकडे जाण्याची शक्यता या निवडणुकीने निर्माण केली आहे.

ही निवडणूक ही भारतीय राजकारणाच्या सामाजिक कल्पनेची पुनर्रचना करणारी निवडणूक आहे. भारतीय राजकारणाची सामाजिक कल्पना लक्षात घेऊन भाजपने गेल्या दशकभरात परंपरागत शहाणपण मोडीत काढले होते. त्यातला पहिला मुद्दा होता हिंदुत्वाच्या अस्मितेचे बळकटीकरण. आपल्या हिंदुत्वाच्या संकल्पनेत काही प्रमाणात ओबीसी आणि दलितांचा समावेश करून भाजपने आपला सामाजिक पाया रुंदावण्याचा प्रयत्न केला. अल्पसंख्याकांचे महत्त्व कमी करण्यासाठी समाजात फूट पाडण्याचाही प्रयत्न केला. पण ही रणनीती आता निरुपयोगी ठरली आहे. दलित भाजपपासून दूर होत बहुधा इंडिया आघाडीकडे सरकले आहेत, असे दिसत आहे. अल्पसंख्याकांना अखेर काँग्रेस आणि सपामध्ये आधार सापडला आहे. हिंदी पट्ट्यातील स्थानिक राजकारणातील सांस्कृतिक असंतोषाच्या मुद्द्यांना स्पर्श करणे, त्याचे सांस्कृतिक एकगठ्ठा मतांमध्ये रूपांतर करणे यातून हिंदू बहुसंख्य कट्टरतावादाकडे झुकण्याची शक्यता होती. काही काळासाठी हिंदू समाजाचा एक तृतीयांश भाग कट्टरतावादी बनवणे, तसे अशक्य नव्हते. कमकुवत आणि दुभंगलेल्या विरोधी पक्षांना त्यांच्या राजकीय फायद्यासाठी तेवढेही पुरेसे असते. पण बहुसंख्य हिंदूंना कायमस्वरूपी कट्टरतावादी करणे अधिक कठीण आहे. पंतप्रधानांनी राग आणि द्वेष यावर सतत बोलत तसा प्रयत्न केला. हे इतके यशस्वी झाले की भाजपच्या टीकाकारांनाही हिंदी पट्टा हा भाजपचा अभेद्य बालेकिल्ला वाटू लागला. या निवडणुकीच्या निकालांनी या कथनाला (नॅरेटिव्ह) छेद दिला आहे. पण त्यातून मिळालेला मोठा धडा असा आहे की सामाजिक अस्मिता राजकारणापेक्षा वरचढ ठरू शकत नाही. आता त्याच राजकारणाची वेगवेगळ्या संदर्भात पुनर्रचना होऊ शकते.

भाजपने आर्थिक पातळीवर जी कामगिरी केली आहे, तिचे भाजपला मिळालेला जनादेश पूर्णपणे खंडन करत नाही. लोकांच्या मनात सर्वसामान्यपणे भाजपबद्दल राग वगैरे नव्हता. पण कल्याणकारी युतींना त्यांच्या त्यांच्या मर्यादा असतात हे यातून स्पष्ट होते. कल्याणकारी योजनांवर काम केले, पायाभूत सुविधा आणल्या आणि त्यानंतर आपण तिथेच अडकलो हे दशकभरापूर्वी काँग्रेसच्या लक्षात आले. राजकीय फायदा मिळवण्यासाठी भाजपनेदेखील हेच सगळे अधिक प्रमाणात आणि अधिक वेगाने करण्याचा प्रयत्न केला. पण आपल्याकडे अर्थव्यवस्थेत मूलभूत संचरचनात्मक बदल न करताच युती सरकारे एक किंवा दोन टर्म सत्तेवर असतात. याच्या परिणामी त्यांचेच काय कोणतेही सरकार असुरक्षित होण्याचा धोका संभवतो.

अखेर, या निवडणुकीने भाजप हा 'पार्टी विथ डिफरन्स' पक्ष आहे, हा समजही मोडीत काढला आहे. भाजपचा उघड उघड संरचनात्मक भ्रष्टाचार, संस्थात्मक औचित्याकडे संपूर्ण दुर्लक्ष आणि त्याच्या सार्वजनिक चर्चेतील असभ्यपणामुळे पंतप्रधान भाजपचा जो सद्गुणांचा मुखवटा दाखवू पाहतात, तो आणि पक्षाचे ठोस दुर्गुण यांच्यातील अंतर उघड झाले. पंतप्रधान मोदी आजही लोकप्रिय आहेत. परंतु या निवडणुकीच्या प्रचारमोहिमेमध्ये लोकांना त्यांच्यातील एक नेता दिसला नाही तर, तर एक सतत आत्मस्तुती करणारी व्यक्ती दिसली. ते स्वतःच्या देवत्वाच्या भ्रमात कैद झालेले होते. आणि नेहमीप्रमाणेच, त्यांचे हे आत्म-प्रेम हे त्यांच्या असुरक्षिततेमागचे कारण होते.

अशा प्रकारच्या निवडणुकीत निकाल आणि त्याचा परिणाम यांचा अर्थ लावणे हे सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष या दोघांनाही कठीण असते. मोदी या निकालांमुळे थोडे तरी नम्र झाले आहेत. पण त्यांनी खतपाणी घातलेला जातीयवाद सहजासहजी नष्ट होणार नाही. सत्तेचे केंद्रीकरण हा भारतासाठी रामबाण उपाय नाही याचा पुरावा या निवडणुकीने दिला आहे. पण नवीन राजकीय रचनेत राष्ट्रीय पुनरुत्थानासाठीची धोरणात्मक सहमती असेल का, हा प्रश्न आहे. ते सगळे असो, सध्या तरी, निवडणुकीने दिलेल्या स्वातंत्र्याच्या गोड अमृताचा आस्वाद घेण्याचा हा क्षण आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)




ठाणे - आमदार प्रताप सरनाईक यांना ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांना भेटून ठाण्यातील विविध समस्य बाबत चर्चा केली यावेळी महापालिका अधिकारी उपस्तित होते

# ठाणे जिल्हा एकविध क्रीडा महासंघाच्या अध्यक्षपदी जगन्नाथ शिंदे यांची निवड

● कल्याण : ठाणे जिल्ह्यातील सर्व एकविध क्रीडा संघटनांची जगन्नाथ (आप्पा) शिंदे यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त सभा रविवार ९ जून रोजी कल्याण केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनच्या सभागृहात संपन्न झाली. या संयुक्त सभेला आर्चरी, ॲथलेटिक्स, आट्या पाट्या, बॉल बॅडमिंटन, कबड्डी, टेनिक्वाईट, वुशू, हॅन्डबॉल, ज्युदो, फुटबॉल, बॉक्सिंग, जिमनॅस्टिक, रोलबॉल, कुस्तीगीर, टेनिस बॉल क्रिकेट, फेन्सिंग, सॉफ्टबॉल, स्क्वॅश रॅकेट, रायफल शूटिंग, कॅरम, लंगडी, तायक्वांदो, स्केटिंग या एकविध



क्रीडा संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

ठाणे जिल्ह्यातील सर्व एकविध क्रीडा संघटनांनी एकत्र येवून, 'ठाणे जिल्हा एकविध क्रीडा महासंघ ' हे संस्थेचे नाव निश्चित केले आणि महासंघाचे अध्यक्ष म्हणून जगन्नाथ शिंदे यांची सर्वानुमते निवड केली. खेळाडू हा केंद्रबिंदू मानून ठाणे जिल्ह्यातील क्रीडा विकास होण्यासाठी प्रयत्न करणे व क्रीडांगणावरील पायाभूत सुविधा सुधारणे आवश्यक आहे, असे लिना मॅथ्यू (खजिनदार, कल्याण तालुका ज्युदो असोसिएशन) यांनी मत व्यक्त केले. प्राविण्य प्राप्त व सहभागी खेळाडूंना ५% आरक्षण मिळावे असे मत मालोजी भोसले (सचिव, ठाणे जिल्हा कबड्डी असोसिएशन) यांनी व्यक्त केले.

कुस्तीगीरांना दर्जेदार मॅट महानगरपालिकांनी उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत असे सुभाष ढोणे (सचिव, कल्याण डोंबिवली परिसर कुस्तीगीर संघ) यांनी सूचविले. ठाणे जिल्ह्यातील सर्व एकविध क्रीडा संघटना एकत्र येण्याचा इतिहास कल्याणच्या ऐतिहासिक नगरीत घडला, ही मोठी अभिमानाची गोष्ट आहे असे मत अविनाश ओंबासे (सचिव , ठाणे जिल्हा तायक्वांदो असोसिएशन) यांनी मांडले. ॲथलेटिक्स, हॉकी व फुटबॉल या सारख्या खेळांना मोठ्या क्रीडांगणाची आवश्यकता आहे असे अशोक आहेर (ठाणे जिल्हा अमॅच्युअर ॲथलेटिक असोसिएशन) यांनी मांडले.

## ...तर रस्त्यांवर तुंबलेल्या पाण्यात बसणार




● कल्याण : अटाळी परिसरात सखल भागात पूर्वीपासून लोकवस्ती वाढली गेली असल्याने त्यातच मोठ्या प्रमाणात इमारती निर्माण झाल्याने पाण्याचा निचरा होण्यासाठी पर्यायी व्यवस्था कोलमडल्याने पहिल्याच पावसात पाणी तुंबल्याने भुयारी गटाराची योजना कुठे गेली असा सवाल येथे उपस्थित केला जात आहे.

आंबिवली रेल्वे स्थानकाकडून अटाळी परिसराकडे जाण्यासाठी जुना रस्ता कार्यरत आहे. त्या रस्त्याचे काम पालिकेत कागदोपत्री झाले असून प्रत्यक्षात मात्र रस्ता तयार होण्यास गेल्या अनेक वर्षापासून विलंब लागल्याचे दिसून येत आहे. रस्त्याला पायवाटांचा दर्जा देत हजारो पादचारी या ठिकाणीहून पायपीट करीत आहेत. रस्ता रुंदीकरण लटकल्याने नाले व गटार गटारी बनविण्यात पालिकेने स्वारस्य दाखविले नाही. त्यातच सरळ आडव्या इमारती बांधल्या गेल्याने अनेक वर्षापासून चाळीत राहत असणाऱ्या नागरिकांच्या घरात पाणी तर शिरकाव करतोच मात्र पाणी साचल्याने रस्त्यावरून चालणे मुश्किल होऊन बसले आहे. अंबिवली स्टेशन पासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या मोतीराम पाटील नगर मध्ये रहिवाशांच्या घरात पाऊस कोसळण्यास सुरुवात झाल्यावर पाणी सरळ घरात शिरते. यामुळे पावसाळयात येथील चाळकऱ्यांची मोठी दैनावस्था होत आहे. विराट गृहसंकुलांना जवळील रस्ता पालिकेने बनविला मात्र अंबिवली स्टेशन ते मोतीराम पाटील नगर रस्ता कुणी गायब केला असा प्रश्न उपस्थित केला गेला आहे. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे तत्कालीन दिवंगत महापौर राजेंद्र देवकर यांनी २१० प्रमाणे रस्त्यांच्या प्रस्तावाला मंजुरी दिली होती. काही काळानंतर रस्ता अर्धवट स्थितीत अडकून पडल्याचे विदारक चित्र दिसून येत आहे . याकडे प्रशासनाचे सततचे दुर्लक्ष केल्याने रस्त्याचा प्रश्न पावसाळयात ऐरणीवर आला आहे. पावसाच्या पाण्याचा रस्त्यावरून निचरा होत नसल्याने तुंबलेल्या पाण्यातून पुन्हा रस्ता शोधत नागरिकांना पायपीट करावी लागणार आहे. महापालिका प्रशासन व आपत्कालीन यंत्रणेने याबाबत त्वरित उपाययोजना न केल्यास तुंबलेल्या पाण्यात बसून अनोखे आंदोलन करण्याचा इशारा अटाळीतील चाळकऱ्यांनी दिला आहे.

# उल्हासनगरमध्ये 117 निरंकारी भक्तांचे उत्स्फूर्त रक्तदान




● कल्याण : प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी संत निरंकारी मिशनची समाजकल्याण शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनच्या विद्यमाने संत निरंकारी सत्संग भवन, गोल मैदान, उल्हासनगर याठिकाणी आयोजित भव्य रक्तदान शिबिरात 117 निरंकारी भक्तांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. यामध्ये 68 पुरुष तर 49 महिला रक्तदात्यांचा समावेश होता. सिव्हिल हॉस्पिटल रक्तपेढी उल्हासनगर आणि संत निरंकारी रक्तपेढी विलेपार्ले यांनी रक्तसंकलनाचे कार्य केले. सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या मानव सेवा हीच प्रभू भक्ती या दिव्य शिकवणुकीला अनुसरुन निरंकारी मिशन सातत्याने रक्तदान शिबिरांचे आयोजन करुन मानवतेच्या सेवेमध्ये आपले योगदान देत आहे. संत निरंकारी मंडळाचे डोंबिवली क्षेत्राचे प्रभारी रावसाहेब हसबे यांनी या शिबिरात उपस्थित राहून रक्त दात्यांचा उत्साह वाढविला. मंडळाचे उल्हासनगर विभागाचे सेक्टर संयोजक किशन नेनवानी यांनी स्थानिक सेवादल युनिट व संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनचे स्वयंसेवक यांच्या सहयोगाने या शिबिराचे सुंदर आयोजन केले.




ठाणे - फी भरली नाही म्हणून शाळेतील ११२ विद्यार्थ्यांना शाळेने बाहेर काढल्याचा प्रकार ठाणे पोलीस स्कुल मध्ये घडला आहे. याविरोधात युवा सेनेने शाळा प्रशासनाला धारेवर धरून मुख्याध्यापिका यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली आहे

# पावसाचे पाणी साचणाऱ्या ठिकाणी पंपांची व्यवस्था करण्याचे निर्देश; मान्सून कालावधीत ठाणे जिल्हा प्रशासनाने सतर्क रहावे - उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई

● ठाणे (जिमाका) - पावसाळयाच्या कालावधीत कोणतीही आपत्ती उद्भवू नये, यासाठी जिल्ह्यातील सर्व यंत्रणांनी सतर्क रहावे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार या पावसाळयात जिल्ह्यात सरासरीपेक्षा अधिक पाऊस अपेक्षित आहे. त्यामुळे स्थानिक प्रशासनाने पाणी साचणे, नाले तुंबणे आदी ठिकाणे शोधून तेथे उपाययोजना कराव्यात, अशा सूचना उत्पादन शुल्क मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी आज दिले.

पालकमंत्री श्री. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली आज मान्सूनपूर्व आढावा बैठक दूरदृश्यप्रणालीद्वारे आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातून जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी सुदाम परदेशी, तहसीलदार संजय भोसले, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. अनिता जवंजाळ सहभागी झाले होते. तसेच ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव, नवी मुंबई महापालिका आयुक्त कैलास शिंदे, जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक डी. एस. स्वामी यांच्यासह जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, तसेच मीरा भाईंदर, उल्हासनगर, भिवंडी, कल्याण डोंबिवली या महापालिकांचे आयुक्त, अंबरनाथ व बदलापूर नगरपरिषदेचे मुख्याधिकारी, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, ठाणे व नवी मुंबई पोलीस आयुक्त, रेल्वे, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, एसटी महामंडळ, पशुसंवर्धन, कृषी, जलसंपदा आदी विभागाचे अधिकारी यावेळी ऑनलाईन उपस्थित होते.

**साथरोगाला आळा घालण्यासाठी पुरेसा औषध साठा ठेवा**

जिल्ह्यातील मान्सूनपूर्व तयारीचा आढावा घेऊन श्री. देसाई म्हणाले की, पाऊस सुरू झाला आहे. त्यामुळे शहरी व ग्रामीण भागात नाले तुंबणे, पाणी साचणे असे प्रकार होतात. अशा ठिकाणी महानगरपालिका, नगर पालिका यांनी पाणी साचणाऱ्या ठिकाणी पाण्याचा उपसा करण्यासाठी पंपांची व्यवस्था करावी. महापालिका, नगरपरिषदांनी आतापर्यंत नालेसफाई पूर्ण केली आहे. परंतु काही वेळेस एकदम येणाऱ्या पावसामुळे अनेकवेळेस गटारीमध्ये घाण साचून नाले तुंबतात. या पाण्यामुळे पूर परिस्थिती निर्माण होवून नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागू शकते. नाल्यांच्या स्वच्छतेकडे नियमित लक्ष ठेवावे.



धोकादायक इमारतींमधील नागरिकांचे तात्पुरते स्थलांतर करण्याचे काम पडल्यास. ही तात्पुरती निवारा केंद्र सुविधांनी सज्ज असावी. या ठिकाणी पिण्याचे पाणी, वीजेची सुविधा असावी, अशा सूचनाही मंत्री श्री. देसाई यांनी दिल्या.

मंत्री श्री. देसाई म्हणाले, नागरी व ग्रामीण भागातील रूग्णालयांमध्ये औषधसाठा पुरेसा उपलब्ध करून ठेवावा. साथरोग नियंत्रणासाठी आरोग्य विभागाने सतर्क असावे. साथरोगावरील औषधांची उपलब्धता निश्चित करावी. गृह विभागाने प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये 'ईमरजन्सी हेल्पलाईन क्रमांका'ची सुविधा सुरू करावी. पूर किंवा पावसाशी निगडीत घटनेशी कॉल आल्यास, तात्काळ संबंधित यंत्रणेला माहिती देवून गरजू नागरिकांना मदत द्यावी.

**जिल्ह्यातील यंत्रणा सज्ज – जिल्हाधिकारी**

यावेळी जिल्हाधिकारी श्री. शिनगारे यांनी मान्सूनपूर्व तयारीची माहिती दिली. आपत्कालीन परिस्थितीत मदत पोचविण्यासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत संबंधित गावांना पुरेशा प्रमाणात साहित्याचे वाटप करण्यात आले आहे. नालेसफाई, घनकचरा, पाणी पुरवठा, साथरोग आदीसंदर्भात संबंधित यंत्रणांना सतर्क राहण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

शोध व बचाव कार्यासाठी तहसीलनिहाय पथक तयार करण्यात आले असून त्यांना आवश्यक ते साहित्य उपलब्ध करून देण्यात आले असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्हास्तरावर आपत्ती नियंत्रण कक्ष कार्यरत करण्यात आले असून तेथे हॉटलाईन उपलब्ध करून देण्यात आले आहेत. आपत्ती निवारण आराखड्याचे काम प्रगतीपथावर असून लवकरच तो पूर्णत्वास आणण्यात येणार आहे. जिल्ह्यात दहा ठिकाणी बहुद्देशीय निवारा केंद्रांची उभारणी करण्यात येणार आहे. दरडप्रवण क्षेत्रातील कामांना मंजुरी देण्यात आली आहे. तसेच 152 पूरप्रवण गावांमध्ये उपाय योजना करण्याचे निर्देश संबंधित प्रशासनास देण्यात आले आहेत. धोकादायक पूल, खड्डेमय रस्त्यांची दुरुस्ती करण्याच्या सूचना संबंधित विभागाना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती यावेळी श्री. शिनगारे यांनी दिली.




ठाणे - ' सील आश्रम ' पनवेल ही संस्था रस्त्यावर / फुटपाथ वर राहणारे बेवारस , आजारी , जखमी ' वेडसर , मुकबधीर (भिकारी वगळुन ) १८ वर्षावरील पुरुष व महिला यांना ताब्यात घेऊन उपचार करून पुर्नवसन करण्याचे सामाजिक कार्य करत आहेत .ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या क्षेत्रातील रूग्णांना घेवून जाणेसाठी या संस्थेने ठाणे पोलिसांना रुग्णवाहिका दिल्या आहेत या रुग्णवाहिकेचे उदघाटन अतिरिक्त पोलीस आयुक्त ज्ञानेश्वर चव्हाण यांच्या हस्ते झाले यावेळी पोलीस अधिकारी व ' सील आश्रमचे पदाधिकारी उपस्थित होते

# सर्व रस्ते नागरिकांना वाहतुकीसाठी सोयीस्कर करण्यासाठी महापालिकेचे प्रयत्न सुरू


● मिरा भाईंदर - मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात महानगरपालिका तसेच एमएमआरडीए च्या माध्यमातून शहरातील बहुतांश ठिकाणी सीसी रोडचे कार्य प्रगतीपथावर आहे. शहरातील सर्व रस्ते नागरिकांना वाहतुकीसाठी सोयीस्कर करण्यासाठी महापालिकेचे युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक संजय श्रीपतराव काटकर (भा.प्र.से.) यांनी शहरात सुरू असलेल्या सर्व रस्त्यांच्या कामाची पाहणी केली.

घोडबंदर येथील अदाणी पॉवर हाऊस येथील रस्त्याची आयुक्त यांनी पाहणी केली असता सदर रस्त्यावर नागरिकांना वाहतुकीसाठी अडचण होत



असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. रस्त्यावरील एक बाजू ही सीसी स्वरूपात असून उर्वरित बाजूचे काम सुरू होते. आयुक्त यांनी तातडीने सार्वजनिक बांधकाम विभागाचे शहर अभियंता दिपक खांबित, कार्यकारी अभियंता व कनिष्ठ अभियंत्यांना सदर रस्ता हा तात्पुरत्या स्वरूपात दुरुस्त करून करण्याचे निर्देश दिले. मा. आयुक्त यांच्या निर्देशानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाने 24 तासांच्या आत सदर रस्त्यावर खडी व रोड रोलरच्या साहाय्याने तात्पुरत्या स्वरूपात वाहतुकीसाठी रस्त्याचे कार्य पूर्ण केलेले आहे. सदर रस्ता सीसी रस्त्यामध्ये लवकरात लवकर पूर्ण करण्याचे कार्य महानगरपालिका करणार आहे.

## पाकिस्तानचा संघ घरी बसावा अन् नवीन संघ बनवा -वसीम अक्रम



नवी दिल्ली : रविवारी अमेरिकेच्या मैदानात टी 20 विश्वचषक स्पर्धेत अटीतटीच्या भारताने पाकिस्तानवर विजय मिळवला. त्यानंतर या विजयामुळे भारताच्या गोलंदाजांचे सर्वांकडून कौतुक करण्यात आले. पण स्पर्धेतील सलग दुसऱ्या पराभवामुळे पाकिस्तानला मात्र टीकेचा सामना करावा लागला. पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू वसीम अक्रमने आपला राग थेट प्रक्षेपण सुरु असताना व्यक्त केला. यावेळी, "सध्याच्या पाकिस्तानच्या संघाला घरी बसावा आणि एक नवीन संघ तयार करा." असा सल्ला यावेळी त्याने दिला.

आयसीसी टी 20 विश्वचषक स्पर्धेमध्ये भारतने पाकिस्तानवर ६ धावांनी विजय मिळवला. यानंतर पाकिस्तानी चाहत्यांनी आणि क्रिकेट समीक्षकांनी संघाच्या कामगिरीवर कडाडून टीका केली. वसीम अक्रमने पाकिस्तानच्या संघ व्यवस्थापनासह खेळाडूंवर बोचरी टीका केली. तो म्हणाला की, "पाकिस्तानच्या संघातील खेळाडू गेल्या 10 वर्षांपासून क्रिकेट खेळत आहेत. त्यामुळे मी त्यांना शिकवू शकत नाही. मोहम्मद रिझवानला खेळाबद्दल काहीच माहिती नाही का? त्याला समजायला हवे होते की, जसप्रीत बुमराहला विकेट घेण्यासाठीच गोलंदाजीला दिली होती. तेव्हा त्याने सावध खेळी करणे अपेक्षित होते. पण मोठा फटका मारण्याच्या नादात रिझवानची विकेट गेली. इफ्तिखार अहमदनेदेखील तेच केले." अशी टीका त्याने केली.

# कोकणातील लोककथेवर आधारित 'मुंज्या'ची प्रेक्षकांमध्ये क्रेझ



'मुंज्या' या चित्रपटाची सध्या बॉक्स ऑफिसवर क्रेझ पाहायला मिळत आहे. या चित्रपटाने प्रदर्शनाच्या तीन दिवसांतच जवळपास २० कोटींहून जास्त कमाई केली आहे. प्रेक्षक हा चित्रपट पाहण्यासाठी गर्दी करत आहेत. या चित्रपटात बॉलीवूडमधील मराठमोळी अभिनेत्री शर्वरी वाघ हिने महत्त्वाची भूमिका साकारली आहे. या चित्रपटाला प्रेक्षकांचा मिळणारा प्रतिसाद पाहून शर्वरी भारावली आहे.

शर्वरीने 'बंटी और बबली २' या बिग बजेट चित्रपटातून बॉलीवूड पदार्पण केले होतं. पण या मराठी मुलीला कोकणातील लोककथेवर बेतलेल्या चित्रपटात मुख्य भूमिका साकारायला मिळाली याचा खूप आनंद आहे. शर्वरीचा 'मुंज्या' चित्रपट बॉक्स ऑफिसवर हिट ठरला आहे. तिच्या कारकिर्दीतील हा दुसरा चित्रपट असून या चित्रपटाच्या यशामुळे तिचं खूप कौतुक होत आहे.

'मुंज्या'ची तिसऱ्या दिवशीही जबरदस्त कमाई, ३० कोटींचे बजेट असलेल्या चित्रपटाने रविवारी कमावले तब्बल...

शर्वरी महाराष्ट्रीय आहे आणि कोकणातील लोककथेवर आधारित तिच्या या चित्रपटाने प्रेक्षकांना थिएटरकडे ज्या पद्धतीने आकर्षित केलंय, हे पाहून तिला आनंद झाला आहे. "मला महाराष्ट्रीय असल्याचा अभिमान आहे, त्यामुळे मराठी लोककथेवर आधारित चित्रपटाला मिळणारं इतकं प्रेम पाहून आणि लोक त्याचं कौतुक करत आहेत हे पाहणं खूप छान वाटतंय. महाराष्ट्रीय लोककथा राष्ट्रीय स्तरावर गाजत आहेत आणि त्यावर बनलेला एक चित्रपट हिट होतोय, हे पाहून मला खूप आनंद होतोय," अशा भावना शर्वरीने व्यक्त केल्या.

कुजलेल्या अवस्थेत आढळला काजोलच्या को-स्टारचा मृतदेह, तीन दिवस वाट पाहूनही कुटुंबीय न आल्याने अभिनेत्रीवर पोलिसांनी केले अंत्यसंस्कार

मुंज्याच्या बॉक्स ऑफिसवरील अप्रतिम कामगिरीबद्दल बोलताना शर्वरी म्हणाली, "मुंज्याने बॉक्स ऑफिसवर खूपच चांगली कामगिरी केली आहे. मी सध्या खूपच आनंदी आहे. माझ्या चित्रपटाला इतकं मोठं यश मिळणं हे माझा आत्मविश्वास वाढवणारं आहे. मला सोशल मीडियावरही संपूर्ण देशभरातील प्रेक्षकांचं प्रेम मिळत आहे, हीच माझ्या कामाची मोठी पोचपावती आहे."

"स्तनांचा आकार वाढविण्यासाठी दबाव...", बॉलीवूड अभिनेत्रीचा खुलासा; म्हणाली, "मी खऱ्या आयुष्यात..."

ती पुढे म्हणाली, "मुंज्यामधील माझं पहिलं गाणं तरस प्रेक्षकांना कसं वाटेल याबद्दल मला खात्री नव्हती आणि आता मी पाहतेय की त्या गाण्यावर लोक त्यावर नाचत आहेत आणि थिएटरमध्ये गाण्याचा आनंद घेत आहेत. हे सगळं पाहून खूप भारी वाटत आहे. मी मोठी होत असताना, चित्रपटाच्या शेवटी डान्स नंबर पाहण्यासाठी मी जागेवरून हलायचे नाही आणि आता लोक थिएटरमध्ये माझ्या गाण्यांचा आनंद घेत आहेत हे पाहणं खूपच सुखावणारं आहे."

'मुंज्या' चित्रपटात शर्वरीशिवाय मोना सिंह, अभय वर्मा, सुहास जोशी, अजय पूरकर, भाग्यश्री लिमये, श्रुती मराठे हे कलाकार आहेत. चित्रपटाचं दिग्दर्शन मराठमोळ्या आदित्य सरपोतदारने केलं आहे.

# जिभेवरून तुमची आरोग्यस्थिती कशी ओळखाल?




लहान मुलं असोत किंवा मोठी माणसं पोट बिघडलं किंवा तब्येतीच्या तक्रारींसाठी डॉक्टरांची भेट घेतल्यास हृदय आणि जीभ या दोन गोष्टी प्रामुख्याने तपासल्या जातात. आहारशास्त्रात जिभेचे चोचले पुरविण्यापेक्षा आवश्यक चवींचे अन्न आहारात समाविष्ट करण्यावर मुख्यत्वे भर दिला जातो. आजच्या लेखात याचबद्दल थोडंसं... "मला सगळयात महत्वाची गोष्ट सांगायची होती . तांब्याचा स्क्रॅपर वापरून जीभ स्वच्छ करायला सुरुवात केल्यापासून मला वाटत माझं खाणं सुधारलंय" समीरा -वय वर्ष २७. गेले अनेक महिने मलावरोध असल्यामुळे तब्येतीच्या विविध तक्रारी घेऊन आली होती. आहारात बदल केल्यापासून तिच्या तक्रारी हळूहळू कमी होत होत्या. पचनाच्या तक्रारींचे मूळ जिभेवरून ओळखता येते, म्हणजे नक्की काय तर?

जिभेची काळजी कशी घ्याल?

आयुर्वेदाचार्य सुश्रुत यांनी चिकित्सा अध्यायात म्हटले आहे – जीभ स्वच्छ करण्यासाठी चांदी, सोने, तांबे किंवा उत्तम धातूच्या काडीचा वापर करावा. दहा बोटाच्या उंचीची एखाद्या झाडाची कोवळी फांदी वापरून जीभ स्वच्छ केली तर उत्तम. यामुळे वाईट चव, तोंडाची दुर्गंधी, जिभेची सूज दूर होते आणि जिभेची चव पूर्ववत होते तसेच उत्तम तेलाने चूळ भरल्यास हिरड्या मजबूत होण्यास तसेच दात शुभ्र होण्यास मदत होते.

जिभेपासूनच पचन प्रक्रियेला सुरुवात

आहारशास्त्रात पदार्थ, त्याचा गंध आणि त्याच्या चवीवरून भुकेची संप्रेरके आणि त्याचा शरीरावर होणार प्रभाव ठरविला जातो. एखाद्या पदार्थाची चव तोंडात वेगेवेगळी संप्रेरके स्रवण्यास मदत करते. अन्नाचा घास असो, औषध असो, भाजी असो किंवा प्राणिजन्य पदार्थ असो जिभेपासून अन्नपदार्थांच्या पचनाची क्रिया सुरू होते. प्रत्येक पदार्थ चवीने किंबहुना अभिरुचीने खाल्ल्यास त्याचे पचन उत्तम प्रकारे होते.

आतड्यातील पेशिका

आपल्या तोंडात किमान ३००० ते १०००० प्रकारच्या विविध चव-पेशिका असतात. याच्या दुप्पट पेशिका आपल्या आतड्यात, जठरात आणि चयापचय संस्थेतदेखील असतात. तोंडातील सूक्ष्माणू यांवर सध्या वेगेवेगळ्या देशांमध्ये संशोधन सुरु आहे. जिभेचे मुख्य काम पदार्थाची चव चाखणं असलं तरी पदार्थाचा ताजेपणा, साठवून ठेवलेल्या पदार्थातील रासायनिक अभिक्रियेमुळे बदललेली चव ओळखणं हे जिभेमुळे शक्य होतं. जीभ स्वच्छ असेल तर अन्न पदार्थ खातानाच त्यातील पोषणतत्वे देखील उत्तम आहेत याची खात्री करणं सोपं जातं.

जिभेची संवेदना

आहारात पाण्याचे प्रमाण उत्तम असेल तर जिभेभवतालच्या चव-पेशिका उत्तमरित्या कार्यरत राहतात. आहारात कमीतकमी प्रक्रिया केलेलं साखर, मीठ यांचं माफक प्रमाण असणारं अन्न जिभेचं आरोग्य उत्तम राखू शकतं. उत्तम दर्जाचं -विशेषतः तेलबियांपासून तयार केलेलं तेल, तूप यामुळे जिभेची संवेदना सजग राहते. अनेक जीवनसत्त्वं आणि खनिजांची कमतरता केवळ जिभेच्या रंगावरून ओळखली जाऊ शकते. विशेषतः जीवनसत्त्व बी १२, लोह यांची कमतरता जिभेच्या पिवळसरपणावरून ओळखता येऊ शकते. खालील तक्ता जिभेवरून तपासल्या जाणाऱ्या काही पचनाशी संबंधित विकारांवर प्रकाश टाकणारा आहे.

जिभेची स्वच्छता

सकाळी उठल्यावर जीभ स्वच्छ करणे आणि त्यासाठी प्लास्टिकपेक्षा धातूचा वापर करणे उत्तम मानले जाते. खोबरेल तेल, तीळ तेल यांनी चूळ भरणे, जेवण झाल्यावर स्वच्छ पाण्याने चूळ भरणे, रात्री झोपताना जीभ स्वच्छ करणे यामुळे पचनसंस्थेचे विकार कमी होण्यास आणि तोंडाचे विकार कमी होण्यास मदत होते. त्यामुळे उत्तम आहाराचं भान ठेवताना जिभेच्या स्वच्छतेवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

## मराठमोळ्या सिद्धार्थ जाधवचा राष्ट्रीय पातळीवर सन्मान!



'अगं बाई अरेच्चा', 'जत्रा', 'बकुळा नामदेव घोटाळे' अशा एकापेक्षा एक दर्जेदार चित्रपटांमधून सिद्धार्थ जाधवने आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे. चित्रपट असो किंवा रंगभूमी सिद्धूच्या अभिनयाचं नाणं नेहमीच खणखणीत वाजतं. एवढंच नव्हे तर गेल्या काही वर्षात सिद्धार्थने बॉलीवूडमध्येही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. विविधांगी भूमिका साकारून तो नेहमीच प्रेक्षकांचं निखळ मनोरंजन करत असतो. सध्या सिद्धार्थ एका वेगळयाच कारणामुळे चर्चेत आला आहे.

सिद्धार्थ जाधवचा राष्ट्रीय पातळीवर एका महत्त्वाच्या पुरस्काराने सन्मान करण्यात आला आहे. यासंदर्भात त्याने एक पोस्ट शेअर करत माहिती दिली आहे. 'दादासाहेब फाळके फिल्म फेस्टिवल २०२४' मध्ये सिद्धार्थला 'बालभारती' चित्रपटासाठी 'सर्वोत्कृष्ट अभिनेता' हा ज्युरी विशेष पुरस्कार देण्यात आला आहे.

मनापासून आनंद होतो... 'बालभारती' सिनेमातल्या माझ्या कामाचं राष्ट्रीय पातळीवर कौतुक केलं जातंय... काम करण्यासाठी तुम्ही जी मेहनत घेता त्यावर कोणीतरी कौतुकाची थाप देत आहे... देशभरातले सगळे रिजनल सिनेमे यात सहभागी झाले होते आणि त्यातून बालभारतीसाठी award मिळणं ही माझ्यासाठी आनंदाची गोष्ट आहे... आमचे producer @official_sphereorigins

सुजय सर ,कोमल मॅम, संपूर्ण टीम आणि मनापासून आभार मानतो मी आमचे दिग्दर्शक लेखक @nitinnandan... लव्ह यू टीम!

दरम्यान, तेजस्विनी पंडित, अभिजीत खांडकेकर, सुकन्या मोने, प्रथमेश परब या कलाकारांनी कमेंट्स करत सिद्धार्थवर कौतुकाचा वर्षाव केला आहे. याशिवाय त्याच्या 'बालभारती' चित्रपटाबद्दल सांगायचं झालं, तर हा चित्रपट २०२२ मध्ये प्रदर्शित झाला होता. मुलांना इंग्रजी बोलता यावं या पालकांच्या हट्टापायी या माध्यमांत प्रवेश घेतला जातो. यानंतर मुलांच्या भविष्यावर याचा कसा परिणाम होतो हे या चित्रपटाच्या माध्यमातून दाखवण्यात आलं आहे. सध्या सिद्धार्थचं सर्व स्तरांतून कौतुक करण्यात येत आहे. लवकरच तो 'सिंघम अगेन' या रोहित शेट्टीच्या बॉलीवूड चित्रपटात झळकणार आहे. येत्या ऑगस्टमध्ये हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

## दिनविशेष

### घटना

२०००: कोची झलेल्या आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत तिरुअनंतपुरमचा नऊ वर्षाचा बुद्धिबळपटू अर्जुन विष्णुवर्धन याला भारतातील सर्वात लहान फिडे मास्टर होण्याचा मान मिळाला.

१९९८: मर्सिडीज-बेंज कंपनी ने क्रिस्लर हि कंपनी ४० अब्ज अमेरिकन डॉलर्स मध्ये विकत घेतली ही इतिहासातील सर्वात मोठी औद्योगिक
विलीनीकरण आहे.

१९९२ : एन्डेव्हर हे अंतराळयान आपल्या पहिल्या मोहिमेवर निघाले.

१९९० : लता मंगेशकर यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान.

१९७६: होंडा एकॉर्डा या गाडी प्रकाशित करण्यात आली.

१९५५: एअर इंडिया ची मुंबई - टोकियो विमानसेवा सुरू झाली.

१९४६: सोनी कंपनी ची स्थापना झाली.

१९०७ : मुंबईत विजेवर चालणारी ट्रॅम सुरू झाली.

१८४९ : जॉन इलियट ड्रिंकवॉटर बेथुन यांनी कलकत्ता फिमेल स्कूल सुरू केले.

### जन्म

१९६७: राम नरेश रावत भारतीय राजकारणी, उत्तर प्रदेशचे आमदार (निधन: ४ सप्टेंबर २०२२)

१९४९ : गोपाल निमाजी वाहनवती भारतीय वकील आणि राजकारणी (निधनः २ सप्टेंबर २०१४)

१९४८ : नित्यानंद हळदीपूर- मैहर घराण्याचे बासरी वादक

१९३२ : राज मोहन वोहरा लेफ्टनंट जनरल महावीरचक्र, परम विशिष्ट सेवा पदक (निधन: १४ जून २०२०) १९२३ : आत्माराम गोविंद भेंडे मराठी नाट्यअभिनेते व दिग्दर्शक

१९१२: पन्नालाल पटेल - गुजराथी कथा-कादंबरीकार ज्ञानपीठ पुरस्कार (निधन: ६ एप्रिल १९८९)

### निधन

२०२२: पार्थ घोष पश्चिम बंगालचे वक्तृत्वकार

२००२: दुर्गाबाई भागवत - जेष्ठ लेखिका, तत्त्ववेत्या (जन्म: १० फेब्रुवारी १९१०)

२००१ : विभावरी शिरूरकर लेखिका (जन्म: १८ मार्च १९०५)

२००१ : प्रेम धवन भारतीय गीतकार पद्मश्री (जन्म: १३ जून १९२३)

१९९८: ऍलन मॅक्लिओड कॉर्मेक - दक्षिण आफ्रिकन-अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ - नोबेल पारितोषिक (जन्म: २३ फेब्रुवारी १९२४)

१९९१: गोपाल नरहर नातूपुणे - लोककवी (जन्म: ११ नोव्हेंबर १९११)

१९९१: मनमोहन नातू - लोककवी गोपाळ नरहर तथा (जन्म: ११ नोव्हेंबर १९११)

## राशि भविष्य

**मेष** – विजयोत्सव साजरा केल्याने तुम्हाला अतीव आनंद मिळेल. मित्रमंडळींसमवेत हा आनंद साजरा करा. तुमच्या पैशामुळे आज अनेक समस्या निर्माण होतील - तुमचा खर्च खूप अधिक होईल किंवा तुमचे पाकीट हरवेल - निष्काळजीपणामुळे काही तोटा निश्चितपणे होईल.

**वृषभ** – बहुतांश घटना आपणाला हव्या तशा घडल्यामुळे उत्साहाने खळाळता, प्रसन्नदायी असा आजचा दिवस असेल. आर्थिक जीवनाची स्थिती आज चांगली सांगितली जाऊ शकत नाही आज तुम्हाला बचत करण्यात समस्यांचा सामना करावा लागू शकतो.

**मिथुन** – विजयोत्सव साजरा केल्याने तुम्हाला अतीव आनंद मिळेल. मित्रमंडळींसमवेत हा आनंद साजरा करा. आजच्या दिवशी समोर येणारे गुंतवणुकींचे नवे पर्याय धुंडाळा, पण प्रकल्पाची व्यावहारिकता सखोलपणे अभ्यासल्यावरच आपला सहभाग जाहीर करा.

**कर्क** – प्रत्येकाला मदत करण्याच्या इच्छेमुळे तुम्ही आज थकून जाल, दमून जाल. पुरातन वस्तू आणि दागदागिन्यांमधील गुंतवणूक फायदा आणि समृद्धी आणेल. आपल्या आजी आजोबांशी बोलताना त्यांच्या भावनांना धक्का लागणार याची काळजी घ्या, बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**सिंह** – आज तुम्हाला अनेक तणावांचा सामना करावा लागण्यीच शक्यता आहे आणि मतभेद झाल्यामुळे तुम्ही त्रासून जाल, अस्वस्थ व्हाल. वेळ आणि धन याची कदर तुम्ही केली पाहिजे अथवा येणारी वेळ समस्यांनी भरलेली राहू शकते. सुखद आणि अनोखी संध्याकाळ साजरी करण्यासाठी तुमच्या घरी नातेवाईकांची गर्दी होईल.

**कन्या** – अध्यात्मिक आणि भौतिक लाभासाठी ध्यानधारणा आणि योगाचा वापर करू शकता. हुशारीने गुंतवणूक करा. नातेवाईक तुमच्यासाठी अनपेक्षित भेटवस्तू आणतील पण तुमच्याकडूनही काही मदतीची अपेक्षा ठेवतील. व्यक्तीच्या कठोर शब्दांनी तुमचे मन बेचैन होईल.

**तूळ** – जीवन आनंदाने जगण्याची आपल्या अपेक्षा आकांक्षा तपासून पाहा. योगसाधनेची मदत घ्या. त्यामुळे तुम्हाला जीवनाचा आनंद शारीरिक, मानसिक आणि अध्यात्मिक पद्धतीने कसा घ्यावा हे शिकता येईल. त्यामुळे तुमच्या स्वभावात सुधारणा होतील.

**वृश्चिक** – गरोदर स्त्रियांनी जमिनीवर चालताना विशेष काळजी घेण्याची गरज आहे. जर आज तुम्ही आपल्या मित्रांसोबत कुठे फिरायला जाण्याचा प्लॅन करत असाल तर, विचार पूर्वक धन खर्च करा. धन हानी होऊ शकते. कुटुंबियांच्या गरजांना प्राथमिकता द्या. त्यांच्याबरोबर आनंदी आणि दु:खी प्रसंगात सामील व्हा, तुम्ही त्यांची काळजी करता हे त्यांना कळू शकेल.

**धनु** – तुम्ही भावनिकदृष्ट्या खूप असुरक्षित असाल - म्हणून तुम्ही दुखावले जाल अशा परिस्थिती-प्रसंगांपासून दूर राहा, सावध राहा. जीवनसाथीच्या आरोग्य संबंधित समस्यांमुळे तुमचे धन खर्च होऊ शकते परंतु, तुम्हाला या विषयी चिंता करण्याची आवश्यकता नाही कारण, धन यासाठीच साठवले जाते की, ते कठीण वेळेत आपल्या कामी येईल.

**मकर** – तणावाकडे दुर्लक्ष करू नका. तंबाखूसेवन आणि मद्यसेवनासारखेच तणाव हाही संसर्गजन्य विकार आहे. आजच्या दिवशी चुकून ही कुणाला पैसे उधार देऊ नका आणि जर देणे खूपच गरजेचे असेल तर, देणाऱ्याकडून लिखित स्वरूपात लिहून घ्या की, तो पैसे परत केव्हा करेल.

**कुंभ** – जेवणात मीठाची गरज ही अपिरहार्य असते, आपल्याला आनंदाची, सुखाची खरी किंमत कळण्यासाठी दुखाची गरज भासतेच. आज तुम्ही सहजपणे भांडवल उभे कराल - राहिलेली देणी परत मिळवाल - किंवा नवीन प्रकल्पांसाठी निधी मागाल.

**मीन** – आरोग्य चांगले राहील. चांगली गुंतवणूक फक्त परतावा मिळवून देतील - त्यामुळे तुमच्या कष्टाचे पैसे गुंतवताना नीट विचार करा. तुमची समस्या गंभीर आहे - पण तुमच्या अवतीभवतीच्या लोकांना तुमच्या वेदना समजणार नाहीत कारण यात लक्ष घालणे हे त्यांचे काम नाही असे त्यांना वाटत राहील.

# शाळेच्या पहिल्या दिवशी गणवेशवाटप अशक्यच!



● पुणे : शाळा सुरू होण्यास काही दिवसच बाकी असताना विद्यार्थ्यांना पहिल्या दिवशी गणवेशाची जोडी देण्याची घोषणा हवेत विरण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांना दोन गणवेश देण्याचा निर्णय घेतलेला असताना अचानक एक गणवेश आणि दुसऱ्या गणवेशाचे कापड देण्यात येणार आहे. मात्र याची शाळास्तरावर अंमलबजावणी करण्यात अडचणी असल्याचे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने निदर्शनास आणून दिले आहे.

राज्यातील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांतील विद्यार्थ्यांना समग्र शिक्षा योजनेंतर्गत एकसमान रंगांचे दोन गणवेश महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत देण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला होता. याची अंमलबजावणी २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून करण्याचेही जाहीर केले गेले. मात्र शाळा सुरू होण्याच्या तोंडावर एक गणवेश आणि दुसऱ्या गणवेशाचे कापड देण्याचे जाहीर केल्यानंतर महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेला पत्र देऊन अडचणी मांडल्या आहेत. विदर्भातील शाळा १ जुलै रोजी तर उर्वरित शाळा १५ जूनला सुरू होणार आहेत. असे असताना अद्याप कोणत्याही शाळेत विद्यार्थ्यांची मापे घेण्यात आलेली नाहीत. तसेच स्काऊट-गाइडच्या गणवेशासाठी कापड देऊन शिलाई आणि आनुषंगिक खर्चासाठी ११० रुपये दिले जाणार आहेत. मात्र, इतक्या कमी खर्चात कोठेही शिलाई करून मिळणार नाही. त्यामुळे स्काऊट-गाइडच्या गणवेश शिलाईची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समिती अर्थात मुख्याध्यापकाकडे देऊ नये, अशी मागणी समितीचे कार्याध्यक्ष विजय कोंबे, राज्य सरसचिटणीस राजन कोरगावकर यांनी केली. विद्यार्थ्यांना योग्य मापाचे दोन्ही गणवेश शिलाई करूनच वितरित करावेत, असे त्यांचे म्हणणे आहे.

गणवेशांचा पुरवठा करण्याचे कंत्राट पद्माचंद मिलापचंद जैन यांना देण्यात आले आहे. कंत्राटदाराने कापलेले कापड प्रत्येक गट शिक्षणाधिकारी कार्यालयास पुरवायचे आहे. त्यानंतर स्थानिक महिला बचत गटाद्वारे गणवेश तयार करून शाळेत पुरवठा करायचा आहे. अंदाजे माप घेऊन शिलाई केल्यास शिक्षकांवर पालकांचा रोष व्यक्त होण्याची भीती आहे. महिला बचत गटांना मोठ्या संख्येने काम मिळाल्याने त्यांनी प्रती गणवेश शंभर रूपये शिलाईदर मान्य केला. मात्र केवळ १५ ते २० पटसंख्या असलेल्या शाळेत हाफ पँट-शर्ट, फूल पँट-शर्ट, सलवार-कुर्ता, स्कर्टची शिलाई, कोण करून देईल, असा प्रश्न मुख्याध्यापकांनी उपस्थित केला आहे. विदर्भात अद्याप १५ दिवस वेळ असल्याने या दरम्यान गणवेश शाळेत पोहचण्याची खात्री असल्याचे वर्ध्याच्या शिक्षणाधिकारी डॉ. नीतू गावंडे यांनी म्हटले आहे. शालेय गणवेशासाठीची कापड खरेदी झाली आहे. एक गणवेश महिला आर्थिक विकास महामंडळाच्या बचत गटांद्वारे दिला जाईल, तर दुसऱ्या गणवेशासाठीचे कापड शाळांना दिले जाणार आहे. त्याबाबतची प्रक्रिया सुरू आहे. – प्रदीपकुमार डांगे, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

यापूर्वी गणवेशाचे दोन संच पुरवण्यासाठी प्रती गणवेश ३०० रुपये शाळा व्यवस्थापन समितीस दिले जात होते. त्यानुसार नियमित गणवेश वाटप होत होते. हे काम व्यवस्थित सुरू असतानाच यावर्षी बदल करण्यात आला. हा बदल अनाकलनीय आहे.

**– विजय कोंबे,**
**कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती**

# गृहमंत्री अमित शहांच्या भेटीनंतर मुरलीधर मोहोळांनी स्विकारला राज्यमंत्रिपदाचा पदभार



● पुणे : महापालिकेतून थेट संसदेत पोहोचलेल्या मुरलीधर मोहोळ यांना केंद्रीय मंत्रिमंडळात सहकार आणि नागरी उड्डान खात्याचे राज्यमंत्रिपद मिळाले आहे. आज (११ जून) मोहोळ यांनी राज्यमंत्रिपदाचा पदभार स्विकारला. पदभार स्विकारण्याअगोदर मोहोळ यांनी गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. पश्चिम महाराष्ट्रातील बहुतांश साखर कारखान्यांवर राष्ट्रवादीचेच वर्चस्व आहे. त्यामुळे दिल्लीतील भाजप नेतृत्वाने राष्ट्रवादी आणि अजित पवारांच्या सहकार क्षेत्रातील वर्चस्वाला आणखी धक्का देण्याची तयारी सुरू केली आहे. त्यामुळेच केंद्रीय सहकारमंत्री अमित शाह यांच्या नेतृत्वाखाली मोहोळ यांना सहकार राज्यमंत्रिपदाची धुरा देण्यात आली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील मराठा चेहरा म्हणून मोहोळ यांचे नेतृत्व उदयास आणले आहे. याबाबत मुरलीधर मोहोळ म्हणाले की, समाजातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचण्याचे काम करणारे खाते म्हणजे सहकार खाते आहे. मी शेतकऱ्याचा मुलगा असल्याने मला त्या खात्याची माहिती आहे. मला देशातील शेतकऱ्यांसाठी काम करायची संधी आहे. नवी मुंबईमधील विमानतळ, पुणे विमानतळ यासाठी मला काम करता येईल.

नवीन विमानतळ टर्मिनल मार्गी लागणार?

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळात मुरलीधर मोहोळ यांना नागरी उड्डयन व सहकार खाते देण्यात आले. त्यामुळे पुण्यातील विमानतळ तसेच सहकार खात्याशी संबंधित प्रश्न मार्गी लागतील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. लोहगाव येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या नवीन टर्मिनलचे उद्घाटन झाले असले तरी अद्याप येथून वाहतूक सुरू झालेली नाही. यातील अडचणींवर लक्ष घालून नवीन टर्मिनल पूर्ण क्षमतेने सुरू झाल्यास पुणेकरांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच मेट्रो प्रकल्पात लक्ष घालावे, अशी अपेक्षा आहे.

# "मणिपूर भारताचा महत्त्वाचा भाग




● मणिपूर - मागील काही महिन्यांपासून मणिपूरमध्ये हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. दोन समुदायातील वादामुळे तेथे कायम तणावाचे वातावरण आहे. हिंसाचाराच्या घटनांमध्ये अनेक लोकांचा मृत्यूही झाला होता. तसेच अनेकदा जाळपोळीच्या घटनाही घडल्या आहेत. अशातच मणिपूरमधील या परिस्थितीबाबत काल राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनीही अप्रत्यक्षपणे मोदी सराकरला लक्ष्य केलं. दरम्यान, आता शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनीही मणिपूरच्या मुद्द्यावरून मोदी सरकारवर टीकास्त्र सोडलं आहे.

सुप्रिया सुळे यांनी आज पुण्यात पावसाच्या परिस्थितीची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना मोहन भागवत यांच्या विधानाबाबतही विचारण्यात आलं. यासंदर्भात बोलताना, मणिपूरच्या प्रश्नाकडे मोदी सरकार दुर्लक्ष करतंय हे खरं करून असून ते मणिपूरचा म देखील बोलायला तयार नाहीत, अशी टीका त्यांनी केली.

नेमकं काय म्हणाल्या सुप्रिया सुळे?

"गेल्या वर्षभरात मणिपूरच्या प्रश्नावर अनेकदा चर्चा झाली आहे. मणिपूर हा आपल्या देशाचा महत्त्वाचा भाग आहे. तिथल्या महिला, मुलं, पुरुष हे सगळे भारतीय आहेत. काल परवाच मणिपूरच्या मुख्यमंत्र्यांच्या ताफ्यावरही हल्ला झाला आहे. यांचा अर्थ काही तरी चुकतयं", असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.

"मणिपूरच्या प्रश्नावर संसदेत चर्चा व्हावी, अशी मागणी आम्ही अनेकदा केली आहे. मात्र, केंद्र सरकारने यावर चर्चा केली नाही. हे सरकार मणिपूरचा म देखील बोलायला तयार नाही. इंडिया आघाडीच्या नेत्यांनी मणिपूरमध्ये जाण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांना तिथे जाऊ दिलं नाही. मणिपूर हा भारताचा अविभाज्य भाग आहे, मग तिथल्या लोकांना अशी वागणूक का दिली जात आहे", असा प्रश्नही त्यांनी विचारला.

## मोहन भागवत काय म्हणाले होते?

दरम्यान, काल ( मंगळवारी ) नागपूरमधील एका कार्यक्रमात बोलताना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी मणिपूरच्या मुद्द्यावरून मोदी सरकारला अप्रत्यक्षपणे लक्ष्य केलं होतं. "गेल्या एका वर्षापासून मणिपूर शांतता प्रस्तापित होण्याची वाट बघतो आहे. त्यापूर्वी १० वर्ष मणिपूरमध्ये शांतता होती. तेथील गन कल्चर संपुष्टात आलं, असं वाटत होतं. मात्र, काही महिन्यांपूर्वी तिथे अचानक हिंसाचार उफाळून आला किंवा उफाळून आणल्या गेला. तेव्हापासून आजपर्यंत मणिपूरमध्ये हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. या मुद्द्याकडे प्राथमिकतेने लक्ष्य द्यायला हवं. हे आपलं कर्तव्य आहे", अशी प्रतिक्रिया मोहन भागवत यांनी दिली होती.

# वणव्यांमुळे रामशेजच्या मोर बनातून मोर गायब, शिवकार्य गडकोटच्या मोहिमेत गणेश तळे गाळमुक्त



● नाशिक: शिवकार्य गडकोट संवर्धन संस्थेच्या १९७ व्या रामशेज दुर्ग संवर्धन मोहिमेत श्रमदानातून बहुतांशी कोरड्या पडलेल्या मोठ्या आकारातील गणेश तळ्यातील दगडे काढण्यात आली, गणेश तळे पूर्णपणे गाळमुक्त करण्यात आले. वणव्यांमुळे किल्ल्याचे नैसर्गिक नुकसान होत असून मोर बनातून मोर गायब झाल्याचे निरीक्षण संस्थेने नोंदविले आहे. अनेक मोर, वन्यजीव विस्थापित झाले असून किल्ला वणवामुक्त करण्याची मागणी करण्यात आली आहे.

रामशेजच्या पायथ्याला किल्ल्यावर जा-ये करण्यासाठी नोंदणी कक्ष बांधावा, चिंचेसमोर प्रशस्त जागेत दुर्गसंवाद कट्ट्यासाठी गोलाकार दगडाची बैठक, किल्ल्यावर पूर्णत: प्लास्टिक बंदी, कुऱ्हाडबंदी, चराईबंदी करावी याबाबतची मागणी वन विभाग आणि स्थानिक उपसरपंच संदीप कापसे यांच्याकडे करण्यात आल्याचे शिवकार्य गडकोट संवर्धन संस्थेचे संस्थापक तथा दुर्ग अभ्यासक राम खुर्दळ यांनी सांगितले.

नाशिकच्या शिवकार्य गडकोट संवर्धन संस्थेने २००० पासून आजपर्यंत नाशिक जिल्ह्यातील गडकिल्ले, पुरातन बारव, शिवकालीन तळे, कुंड, जुन्या समाधींचा जीर्णोद्धार व संवर्धन कार्य अखंडितपणे केले आहे. नाशिकपासून अवघ्या १२ किलोमीटरवरील रामशेज किल्ल्याचे श्रमदानातून अनेक ऐतिहासिक वास्तूंचे अभ्यासपूर्ण संवर्धन केले आहे. यंदा कडक उन्हामुळे पहिल्यांदाच रामशेजवरील टाके कोरडे पडले आहे. काहींचे पाणी पूर्ण तळाला गेले आहे. या कोरड्या टाक्यातील गाळ काढणीच्या मोहिमेत शिवकार्य गडकोट संवर्धन संस्थेच्या दुर्ग संवर्धकांनी केलेल्या श्रमदानात किल्ल्यावरील व्यावसायिकानी केलेला कचरा वेचून गणेश टाक्यातील गाळ व दगडे काढण्यात आली. एकूणच किल्ल्यावरील सर्वच टाके गाळमुक्त केले जाणार आहेत.

## रामशेजसह ६० किल्ल्यांची दुरवस्था

■ रामशेजसह नाशिक जिल्ह्यातील ६० पेक्षा अधिक किल्ल्यांची दुरवस्था झाली आहे, स्थानिक लोकप्रतिनिधी व पुरातत्व विभागाच्या दुर्लक्षाने गडांसह येथील ऐतिहासिक वारसा दुर्लक्षित व मोडकळीस आला आहे. रामशेजवरील टेहळणी बुरुज, चोरखिंड, पश्चिम द्वार यांची दुरुस्ती व्हावी, यासाठी वारंवार मागणी करण्यात आली. रामशेजच्या नैसर्गिक स्थितीला धोका आहे. काही विकृत लोकांनी लावलेल्या वणव्यांमुळे दरवर्षी किल्ल्याचे नैसर्गिक नुकसान होते. मोरबन मोरमुक्त झाले आहे, अनेक मोर, वन्यजीव विस्थापित झाले आहेत. किल्ला वणवामुक्त करावा, हतगड किल्ल्याचे शिवकालीन किल्लेदार वीर गंगाजी उर्फ गोगाजी मोरे देशमुख यांची समाधी अतिक्रमणमुक्त करावी, तिचा जीर्णोद्धार करावा, रण मैदानातील चिरा मुक्त करावा याकडे पुरातत्व, वन विभागाने लक्ष देण्याची गरज आहे. मात्र त्याबाबतील दुर्लक्षच आहे. नाशिक जिल्ह्यातील दुर्गसंवर्धक मुख्य संस्था, जिल्हाधिकारी, तहसीलदार, राज्य पुरातत्व, वन विभागाच्या सदस्यांची जिल्हाधिकाऱ्यांनी समिती गठीत करावी, सह्याद्रीतील डोंगरफोड थांबवावी, याबाबतीत पुन्हा निवेदन दिले जाईल, असे संस्थेचे संस्थापक राम खुर्दळ यांनी बैठकीत सांगितले.

# 'वंचित'ची भूमिका भाजप व शिंदे गटाच्या पथ्यावर; पश्चिम वऱ्हाडात महाविकास आघाडीला...



● अकोला : पश्चिम वऱ्हाडातील अकोला आणि बुलढाणा लोकसभा मतदारसंघामध्ये मतविभाजनाचा महाविकास आघाडीच्या उमेदवारांना जबर फटका बसला आहे. वंचित आघाडीची भूमिका अकोल्यात भाजपच्या, तर बुलढाण्यामध्ये शिवसेना शिंदे गटाच्या पथ्यावर पडली. बुलढाणा मतदारसंघात ठाकरे गटाला मात देण्यासाठी शिंदे गटाने मतविभाजनाची आखलेली रणनीती यशस्वी झाल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. या विजयामुळेच जिल्ह्याला केंद्रीय मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व देखील मिळू शकले.

लोकसभा निवडणुकीमध्ये राज्यात महायुतीची पीछेहाट झाली. राज्यात मतविभाजन फॅक्टर महत्त्वपूर्ण ठरते. ते टाळण्यासाठी वंचितला सोबत घेण्याचे प्रयत्न मविआकडून झाले. मात्र, नेहमीप्रमाणे वंचित व मविआचे सूर जुळले नाहीत. त्यामुळे ॲड. प्रकाश आंबेडकरांनी स्वबळावर उमेदवार उभे केले. त्याचा फटका मविआला काही जागांवर बसला. त्यामध्ये प्रामुख्याने अकोला आणि बुलढाण्याच्या जागेचा समावेश होतो. अकोला मतदारसंघात परंपरेनुसार तिरंगी लढत झाली. या निवडणुकीमध्ये भाजपचे अनुप धोत्रे यांना चार लाख ५७ हजार ०३०, काँग्रेसचे डॉ. अभय पाटील यांना चार लाख १६ हजार ४०४ व ॲड. प्रकाश आंबेडकर यांना दोन लाख ७६ हजार ७४७ मतांवर समाधान मानावे लागले. ४० हजार ६२६ मतांनी अनुप धोत्रे यांनी डॉ. अभय पाटील यांचा पराभव केला. मुस्लीम मतदार काँग्रेसकडे वळल्याचे स्पष्ट झाले. गेल्या निवडणुकीच्या तुलनेत वंचितच्या मतांमध्ये किंचित घट झाली, तर एक लाख ६२ हजारावर काँग्रेसची मते वाढली. तिरंगी लढतीत पुन्हा एकदा भाजपने बाजी मारली. वंचित आणि मविआमध्ये आघाडी झाली असती तर अकोल्यात निकालाचे चित्र वेगळे असते.

बुलढाणा मतदासंघात शिवसेना शिंदे गटासाठी लोकसभा निवडणूक अवघड समजल्या जात होती. निवडणुकीपूर्वी प्रतापराव जाधव यांच्याविषयी विरोधातील सूर होता.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

# जिल्हा परिषदेच्या शाळा १५ जून पासून सुरू होणार



● अलिबाग (रत्नाकर पाटील) - १५ जूनपासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होत असून, शिक्षण विभागाची जय्यत तयारी सुरु आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी प्रवेशोत्सव राबविण्यात येणार असून, एकही बालक शाळाबाह्य राहणार नाही याची काळजी घेतली जात असल्याची माहिती, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड व प्राथमिक शिक्षण अधिकारी पुनिता गुरव यांनी दिली आहे.

रायगड जिल्ह्यात जिल्हा परिषद तसेच अनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना शासनाकडून पाठ्यपुस्तके देण्यात येतात. ही पाठ्यपुस्तके विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी मिळतील असे नियोजन करण्यात येत आहे. सरकारच्या बालभारती विभागाकडे शिक्षण विभागाने पुस्तकांची मागणी केली होती. सरकारकडून पुस्तके प्राप्त झाली असून, ही पुस्तके तालुक्याच्या गटशिक्षण अधिकाऱ्यांमार्फत केंद्रप्रमुख व केंद्रप्रमुखांच्या माध्यमातून मुख्याध्यापकांकडे सूपूर्द करण्यात येत आहेत. रायगड जिल्ह्यातील पहिली ते आठवीपर्यंतच्या १ लाख ८४ हजार १६२ विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तकांचे वाटप करण्यात येणार आहेत.जिल्ह्यात एकही शाळाबाह्य विद्यार्थी राहणार नाही या दृष्टीने शिक्षण विभागामार्फत पाऊले उचलण्यात येत आहेत. १५ जून रोजी शळा सुरु होणार आहेत.

# कोल्हापूर शहराचे बकालीकरण करणाऱ्या महानगरपालिका प्रशासनाविरुद्ध आंदोलनाला सुरुवात




● कोल्हापूर : कोल्हापूर शहराच्या बकालीकरणास कारणीभूत, ढिम्म, अकार्यक्षम आणि बेजबाबदार महानगरपालिका प्रशासनाच्या विरोधात जन आंदोलनाची सुरुवात मंगळवारी लाक्षणिक उपोषणाने करण्यात आली. माजी नगरसेवक अजित ठाणेकर, विजयसिंह खाडे पाटील, चंद्रकांत घाटगे, प्रदीप उलपे आदींसह कार्यकर्त्यांचा यामध्ये समावेश आहे.

कोल्हापूर शहरात नागरी समस्यांनी सध्या अक्षरशः थैमान घातले आहे. गेली सुमारे साडेतीन वर्षे महानगरपालिकेत प्रशासकराज असताना आणि लोकप्रतिनिधींचा हस्तक्षेत नसतानाही कोल्हापुरातील नागरी सुविधांचा बोजवारा उडाला आहे. शहराचे बकालीकरण सुरू आहे. १५ दिवसात सर्व समस्यांचे निराकरण न झाल्यास आणि शहराचे बकालीकरण न थांबल्यास नागरिकांच्या साथीने तीव्र जन आंदोलन उभे करणार असा इशारा देण्यात आला होता. पण प्रशासनाने या समस्या दूर करण्यासाठी कोणतीही पाऊले न उचलल्यामुळे अखेर आंदोलन सुरुवात करण्यात आले आहे.

नोव्हेंबर २०२० मध्ये कोल्हापूर महानगरपालिकेच्या सभागृहाची मुदत संपली. तेव्हापासून गेले साडेतीन वर्षे महानगरपालिकेत सर्व कारभार आयुक्त तथा प्रशासक यांच्या अधिकारात चाललेला आहे. या साडेतीन वर्षात पाणीपुरवठा, आरोग्य, विकास कामे, नगररचना, उद्यान, इस्टेट विभाग अशा नागरिकांशी थेट संबंध असणाऱ्या सर्वच खात्यांचे कामात कमालीचा ढिसाळपणा आला आहे. गाजावाजा करून आणलेल्या थेट पाईपलाइनचे पाणी कोल्हापुरात दोन महिन्यांपूर्वी येऊनही कोणत्या ना कोणत्या भागात रोज पाण्यासाठी आंदोलने होत आहेत. वांगी बोळ, देशपांडे गल्ली, पोतनीस बोळ, मिरजकर तिकटी या कायम पाण्याची समस्या भेडसावणाऱ्या शहराच्या मध्यवर्ती परिसरा सोबतच शहराच्या सर्व जुन्या पेठात आणि काही उपनगरात पाणीपुरवठ्यच्या समस्येने गंभीर रूप धारण केले आहे.

शहरातील कचरा उठाव आणि प्रक्रीया याचा कोणताही ताळमेळ होत नसल्याने आणि कचरा उठावामध्ये वारंवार अडचणी निर्माण होत असल्यामुळे शहरात ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचल्याचे दिसत आहे.

# धोम-बलकवडी धरणाने तळ गाठला

## गोळेगाव येथील पुरातन मंदिरांचे दर्शन तब्बल चोवीस वर्षांनंतर घडले



● वाई : वाई तालुक्याच्या पश्चिमेकडे असलेल्या धोम-बलकवडी धरणाने अनेक वर्षांनंतर तळ गाठला. हे धरण कोरडेठाक पडल्याने धरणाच्या पोटात गाडल्या गेलेल्या गोळेगाव येथील पुरातन मंदिरांचे तब्बल चोवीस वर्षांनी दर्शन घडले आहे. श्री धुरेश्वर मंदिर व श्री गोकर्णेश्वर मंदिर पाहण्यासाठी खुले झाल्याने नागरिकांमध्ये हा कुतूहलाचा विषय ठरला आहे.

सातारा जिल्ह्यात गेल्यावर्षी सरासरी इतकाही पाऊस झाला नाही. त्यामुळे जिल्ह्यातील धरणेदेखील पूर्ण क्षमतेने भरू शकली नाहीत. वाई तालुक्यातील धोम व धोम बलकवडी धरणातही यंदा अल्प पाणीसाठा होता. बलकवडी धरणाची निर्मिती १९९५ मध्ये झाली. यावेळी धरणाच्या निर्मितीत योगदान देणारे गोळेगाव, गोळेवाडी हे गाव व गावातील पुरातन मंदिरे धरणात गाडली गेली. तब्बल चोवीस वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर धरणातील पाण्याने तळ गाठला अन् धरणाच्या पोटात गुडूप झालेला इतिहास पुन्हा दृष्टिक्षेपात पडला. धरणात श्री धुरेश्वर मंदिर व श्री गोकर्णेश्वर मंदिर पाहण्यासाठी खुले झाले असून, काही इतिहासप्रेमी संस्था तसेच तरुणांकडून या मंदिरांमधील गाळही काढण्यात आला आहे. ही पुरातन मंदिरे नागरिकांच्या कुतूहलाचा विषय ठरली असून, हा इतिहास पाहण्यासाठी नागरिकांची पावले धरणाकडे वळू लागली आहेत.

# राज्यातील शाळांमध्ये १५ जूनपासून 'एक राज्य एक गणवेश' लागू, मुला-मुलींसाठी कोणत्या दिवशी कोणता गणवेश असणार? नियमावली जारी

● मुंबई, प्रतिनिधी :

केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा कार्यक्रमांतर्गत शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमधील पहिली ते आठवीमध्ये शिक्षण घेत असलेल्या मुला-मुलींना मोफत गणवेश योजनेचा लाभ देण्यात येतो. 2024-25 या शैक्षणिक वर्षापासून मोफत गणवेश योजनेचा लाभ शासनाच्या वतीने देण्यात येत आहे. त्यासाठी सर्व शाळांमध्ये स्थानिक महिला बचत गटांमार्फत शिलाई करुन एकसमान एक रंगाचे दोन गणवेश उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. एकसमान एक रंगाचा दर्जेदार गणवेश शासन स्तरावरुन उपलब्ध करुन देण्याबाबत आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

इ.1 ली ते इ.4 थी मुली

नियमित गणवेश -सोमवार, बुधवार व शुक्रवार आकाशी रंगाच्या बाह्या असलेला गडद निळया रंगाचा पिनो



फ्रॉक स्काऊट व गाईड गणवेश -मंगळवार, गुरूवार व शनिवार

गडद निळया रंगाचा ओव्हरऑल फ्रॉक

इयत्ता 5 वी मुली

नियमित गणवेश -सोमवार, बुधवार व शुक्रवार

आकाशी रंगाचा शर्ट व गडद निळया रंगाचा स्कर्ट

स्काऊट व गाईड गणवेश -मंगळवार, गुरूवार व शनिवार

गडद निळया रंगाचा ओव्हरऑल फ्रॉक

इ.6 वी ते इ.8.वी मुली आणि इ.1 ली ते इ.8 वी मुली (ऊर्दू माध्यम)

नियमित गणवेश -सोमवार, बुधवार व शुक्रवार

आकाशी निळया रंगाची कमीज, निळया गडद रंगाची सलवार व गडद निळया रंगाची ओढणी

स्काऊट व गाईड गणवेश -मंगळवार, गुरूवार व शनिवार

गडद आकाश निळया रंगाची कमीज, गडद निळया रंगाची सलवार, गडद निळया रंगाची ओढणी

इ.1 ली ते इ.7 वी मुले-

नियमित गणवेश - सोमवार, बुधवार व शुक्रवार

आकाशी रंगाचा शर्ट व गडद निळया रंगाची हाफ पॅन्ट

स्काऊट व गाईड -मंगळवार, गुरूवार व शनिवार

स्टील ग्रे रंगाचा हाफ शर्ट व गडद निळया रंगाची हाफ पॅन्ट

इ.8 वी मुले

नियमित गणवेश -सोमवार, बुधवार व शुक्रवार

आकाशी रंगाचा शर्ट व गडद निळया रंगाची फुल पॅन्ट

स्काऊट व गाईड -मंगळवार, गुरूवार व शनिवार

स्टील ग्रे रंगाचा हाफ शर्ट व गडद निळया रंगाची फुल पैट

शासन निर्णयात नमूद केल्यानुसार विद्यार्थ्यांनी सोमवार, बुधवार व शुक्रवार या दिवशी नियमित गणवेश धारण करणे आवश्यक राहील. तसेच स्काऊट व गाईड या विषयाचा गणवेश मंगळवार, गुरूवार व शनिवार या तीन दिवशी विद्यार्थ्यांनी सदर गणवेश परिधान करावा. स्काऊट व गाईड विषयाचा गणवेश असलेल्या दिवशी (मंगळवार, गुरुवार, शनिवार) स्काऊट व गाईड विषयाच्या तासिका ठेवण्यात येणार आहेत. मोफत गणवेश योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या गणवेशाची शिलाई महिला आर्थिक विकास महामंडळामार्फत करण्यात येत आहे. राज्यातील शाळा 15 जून, 2024 पासून सुरू होत आहेत. महिला बचत गटामार्फत सद्यस्थितीत नियमित गणवेशाची शिलाई सुरू आहे. योजनेंतर्गत पात्र विद्यार्थी संख्या लक्षात घेता दुसऱ्या (स्काऊट गाईड) गणवेशाचे कापड शाळा व्यवस्थापन समितीस देण्यात येत आहे सदर स्काऊट गाईडच्या गणवेश शिलाईसाठी 100 प्रति गणवेश व अनुषंगिक खर्च 10 असे एका गणवेशासाठी एकूण 110 प्रति विद्यार्थी इतकी रक्कम संबंधित शाळा व्यवस्थापन समितीस महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांनी वर्ग करावी, अशा सूचना देण्यात आले आहेत.

# नीट परीक्षेच्या निकालासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाची एनटीएला नोटीस

● नवी दिल्ली, प्रतिनिधी :

वैद्यकीय प्रवेशपूर्व परीक्षेत गैरप्रकार झाल्याचा आरोप विद्यार्थ्यांकडून करण्यात येत आहे. वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या राष्ट्रीय प्रवेश सह पात्रता परीक्षेचा (नीट-यूजी २०२४) निकाल रद्द करावा आणि पुन्हा परीक्षा घेण्यात यावी, अशी मागणी विद्यार्थ्यांकडून करण्यात येत आहे. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे. या याचिकेवर आज सुनावणी पार पडली.यावेळी सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने निकालानंतरच्या प्रक्रियेला तूर्तास स्थगिती देण्यास नकार दिला आहे. तसेच ही परीक्षा आयोजित करणारी नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) या संस्थेला यासंदर्भातील अहवाल मागवला असून नोटीस जारी केली आहे. तसेच या परीक्षेच्या विश्वासार्हतेवर परिणाम झाला असून यावर उत्तर देण्यात यावं, असं न्यायालयाने म्हटलं आहे. यावरील पुढील सुनावणी आता ८ जुलै रोजी पार पडणार आहे. वैद्यकीय प्रवेशपूर्व परीक्षेतील गैरप्रकार झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. यावरून राजकारणही तापलं आहे. हा निकाल नियोजित तारखेआधीच जाहीर करण्यात आल्यामुळे काहींनी आक्षेप घेतला आहे. तसेच या परिक्षेत पैकीच्या पैकी गुण काहींना मिळाले आहेत.



तसेच एका विशिष्ट परीक्षा केंद्रावरील विद्यार्थ्यांना ७२० पैकी ७२० गुण मिळाले, याबद्दलही याचिकेमध्ये अनेक शंका उपस्थित करण्यात आल्या आहेत. यावरून न्यायालयात याचिका दाखल करण्यात आलेली आहे.

दरम्यान, वैद्यकीय प्रवेशपूर्व परीक्षा अर्थात नीट परिक्षेचा निकाल हा वादग्रस्त ठरला आहे. या निकालाविरोधात देशभरातील जवळपास २० हजार विद्यार्थ्यांनी आक्षेप घेतला आहे. यातील काही विद्यार्थ्यांनी न्यायालयात धाव घेतली आहे. विद्यार्थ्यांनी दाखल केलेल्या याचिकेत नीट पुन्हा घेण्यात यावी किंवा श्रेणी गुण पद्धत रद्द करण्यात यावी, अशा पद्धतीची मागणी करण्यात आली आहे. या निकालाबाबत विद्यार्थ्यांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, आता सर्वोच्च न्यायालयाने नॅशनल टेस्टिंग एजन्सीला यासंदर्भातील अहवाल मागवला आहे. तसेच पुढील सुनावणी ८ जुलै रोजी पार पडणार आहे.

# मुंबई साखळी बॉम्बस्फोटाचा गुन्हेगार तुरुंगातून मिळवणार वकिलाची पदवी, अशी देणार परीक्षा

● मुंबई , प्रतिनिधी :



मुंबई ११ जुलै २००६ रोजी झालेल्या साखळी बॉम्बस्फोटाने हादरली होती. मुंबईची जीवन वाहिनी असलेल्या लोकलमध्ये अवघ्या ११ मिनिटांत सात बॉम्बस्फोट झाले होते. त्या बॉम्बस्फोटात २०० लोक मृत्यूमुखी पडले होते. तसेच जवळपास ७०० जण जखमी झाले होते. या बॉम्बस्फोट प्रकरणात शिक्षा भोगत असलेला गुन्हेगार मोहम्मद साजिद मरगूब अन्सारी हा विधी अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहे. त्याला तुरुंगातून पेपर देण्यास मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने परवानगी दिली. मुंबईतील ११ जुलै साखळी बॉम्बस्फोट प्रकरणात शिक्षा भोगत असलेला गुन्हेगार मोहम्मद साजिद मरगूब अन्सारी याने उच्च न्यायालयात विधी अभ्यासक्रमाचा पेपर देण्यासंदर्भात अर्ज केला होता. त्यानंतर आता त्याचा विधी अभ्यासक्रमाचा राहिलेला पेपर १२ जून रोजी घेण्यास न्यायालयाने परवानगी दिली आहे.

# फाईव्ह स्टार हॉटेलांमध्ये तरुणींचं लैंगिक शोषण

## भाजप IT सेल प्रमुखांवर RSS स्वयंसेवकाचा आरोप



● नवी दिल्ली, प्रतिनिधी :

भारतीय जनता पक्षाच्या आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शंतनु सिन्हा यांच्या विरोधात १० कोटी रुपयांचा अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला आहे. संघाचे स्वयंसेवक असलेल्या शंतनु सिन्हा यांनी काही दिवसांपूर्वी मालवीय यांच्यावर महिलांच्या लैंगिक शोषणाचे आरोप केले होते. यानंतर मालवीय यांनी सिन्हा यांच्याविरोधात कायदेशीर पाऊल उचललं आहे.

अमित मालवीय यांच्या विधि विभागानं सिन्हा यांना नोटिस पाठवली आहे. मालवीय यांच्यावर करण्यात आलेले आरोप खोटे आणि निराधार आहे. त्यामुळे माझ्या अशिलाच्या प्रतिष्ठेला आणि मानसन्मानाला धक्का लागला आहे. माझे अशील सार्वजनिक जीवनात सक्रिय आहेत. त्यांच्यावर करण्यात आलेल्या आरोपांबद्दल ३ दिवसांत उत्तर द्या, असं नोटिशीत नमूद करण्यात आलं आहे. तीन दिवसांचा अवधी आज (११ जूनला) संपतो आहे.

भाजपच्या आयटी सेलचे प्रमुख आणि पश्चिम बंगालचे सहप्रभारी असलेल्या अमित मालवीय यांच्यावर लैंगिक शोषणाचे आरोप झाल्यावर काँग्रेसनं आक्रमक भूमिका घेतली आहे. काँग्रेस प्रवक्त्या सुप्रिया श्रीनेत यांनी पत्रकार परिषद घेत मालवीय यांच्यावर टिकेची झोड उठवली. मोदी सरकार सत्तेत येऊन २४ तासही उलटले नसताना भाजप नेत्यांनी त्यांच्या कृष्णकृत्यांनी देशाची मान शरमेनं खाली घालायला लावली.

### सिन्हा यांचे आरोप काय? फेसबुक पोस्टमध्ये नेमकं काय?

पश्चिम बंगाल भाजपमधील पदाधिकारी राहुल सिन्हा यांचे भाऊ आणि संघाचे स्वयंसेवक असलेल्या शंतनु सिन्हा यांनी ७ जूनला फेसबुकवर एक पोस्ट केली होती. त्यांनी मालवीय यांच्यावर गंभीर आरोप केले होते. 'सुंदर बंगाली तरुणी किती सप्लाय होतील याची वाट पाहत अमित मालवीय आताही कोलकात्यातील फाईव्ह स्टार हॉटेलमध्ये बसलेत का? कोण किती तरुणींचा पुरवठा करुन अध्यक्ष होणार ही बंगाल नेतृत्त्वातील स्पर्धा संपली आहे का? समर्थक आणि कार्यकर्ते यांची साथ कशी देता येईल यासाठी स्पर्धा करा. अमित मालवीय आणि दिल्लीतून पाठवलेल्या निरीक्षकांनी तरुणींचा पुरवठा करुन अध्यक्ष पद मिळवण्याची स्पर्धा करु नये,' असं सिन्हा यांनी पोस्टमध्ये म्हटलं होतं.

# बारामतीत काका-पुतण्याची लढत?

● बारामती , प्रतिनिधी :



बारामती लोकसभा मतदारसंघ लोकसभा निवडणुकीतला सर्वात चर्चेत राहिलेला मतदारसंघ होता. कारण महायुतीने सुनेत्रा पवारांना तिकिट दिलं होतं. तर महाविकास आघाडीने सुप्रिया सुळेंना तिकिट दिलं होतं. सुप्रिया सुळेंनी सुनेत्रा पवारांचा पराभव केला. त्यानंतर आता बारामतीत काका-पुतण्या भिडण्याची चिन्हं आहेत. याचं कारण बारामतीतल्या शरदचंद्र पवार पक्षाने केलेली मागणी. अजित पवारांना त्यांचे पुतणे युगेंद्र पवार टक्कर देणार असल्याची चर्चा आहे.

ही चर्चा नेमकी का होते आहे?

बारामतीतल्या विजयानंतर शरद पवार यांनी कार्यकर्त्यांची भेट घेतली. या कार्यकर्त्यांनी मागणी केली युगेंद्र पवारांना तिकिट द्या. बारामतीचा दादा बदलायचा आहे. यानंतर विधानसभा निवडणुकीला युगेंद्र पवार यांना तिकिट देण्याची मागणी वाढते आहे.

# मान्सून आला, पण नाशिककरांना जोरदार पावसाची प्रतीक्षा कायम, 1 हजाराहून अधिक गाव-वाड्यांत भीषण पाणीटंचाई

● नाशिक, प्रतिनिधी :

राज्यात मान्सून दाखल झाला आहे. मात्र अजूनही नाशिकला मान्सूनची प्रतीक्षा कायम आहे. नाशिक जिल्ह्यातील काही भागात दोन दिवस पावसाने जोरदार हजेरी लावली असली तरी मान्सून अजून सक्रीय झाल्याचे दिसत नाही. तर मागील वर्षी पावसाचे प्रमाण कमी असल्याने नाशिक शहरासह जिल्ह्यात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. जिल्ह्यात सध्या 366 गावे आणि 941 वाड्या अशा एकूण 1 हजार 307 गाव-वाड्यांना 399 टँकरने पाणी पुरवठा करावा लागत आहे.



जिल्ह्यातील मोठ्या व मध्यम अशा २४ प्रकल्पांमध्ये ११ जून अखेर केवळ 8.14 टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मागील पावसाळ्यात बहुतांश धरणे ओव्हरफ्लो झाली होती. मात्र, काही धरणाचा पाणीसाठा कमीच होता. गेल्या पावसाळ्यापेक्षा जिल्ह्यातील धरणांचा पाणीसाठा 16 टक्के कमीच झाला होता. त्यात आता जून महिन्यात हा साठा 8.14 टक्के झाला आहे. नाशिककरांची तहान भागविणाऱ्या गंगापूर धरणात सध्या 19.45 टक्के पाणीसाठी आहे. तर गंगापूर धरण समुहात एकूण 17.06 टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. पुढील काही दिवसात मुसळधार स्वरुपात पाऊस न कोसळल्यास पाणी टंचाईचे संकट अधिक गडद होणार आहे. नाशिक जिल्ह्यात सध्या स्थितीत 14 तालुक्यातील सात लाख 20 हजार 372 नागरिक पिण्याच्या पाण्यासाठी टँकर आणि अधिग्रहित केलेल्या विहिरींवर अवलंबून आहेत.

अशी आहे नाशिकची पाणी टंचाईची परिस्थिती

मालेगाव तालुक्यात 44 गावे व 88 वाड्या (56 टँकर)

सिन्नर तालुक्यात 16 गावे व 264 वाड्या (44 टँकर),

बागलाण 34 गावे व 12 वाड्या (42 टँकर),

येवला तालुक्यात 61 गावे व 60 वाड्या (60 टँकर),

सुरगाणा 31 गावे व 11 वाड्या (42 टँकर),

चांदवड 29 गावे व 97 वाड्या (33 टँकर),

पेठ 18 गावे व 13 वाड्या (16 टँकर),

त्र्यंबकेश्वर चार गावे (4 टँकर)

कळवण तालुक्यातील १९ गावे व दोन वाड्या तर दिंडोरीतील पाच गावे पाणी टंचाईला तोंड देत आहे.

# विधानपरिषद निवडणुकीवरुन मविआत खडाजंगी

## नाशिकचे उमेदवार मागे घ्या, काँग्रेसकडून उद्धव ठाकरेंना निरोप

● मुंबई , प्रतिनिधी :



महाविकास आघाडीमध्ये पुन्हा एकदा नाराजी नाट्य पाहायला मिळत आहे. विधान परिषदेच्या निवडणुकीवरून काँग्रेसमध्ये तीव्र संताप आहे. लोकसभेप्रमाणेच ठाकरे गटाने विधान परिषदेच्या चारही जागा परस्पर घोषित केल्याने काँग्रेसमध्ये प्रचंड नाराजी आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी विधानपरिषदेचे उमेदवार मागे घ्या, असा निरोप दिला आहे. प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी एबीपी माझाला माहिती दिली आहे. महाविकास आघाडी असताना घोषणा करण्याच्या आधी चर्चा केली पाहिजे होती अशी काँग्रेसची भूमिका आहे. मुंबईतून विधानपरिषदेसाठी अर्ज भरलेले शिवसेना उबाठाचे उमेदवार ठाकरेंनी कायम ठेवावेत. मात्र कोकण पदवीधर आणि नाशिक शिक्षक उमेदवार ठाकरेंनी मागे घ्यावेत,असा निरोप नाना पटोलेंनी उद्धव ठाकरेंना दिला आहे.

# कल्याणमध्ये सहा महिन्याच्या बाळाची चोरी, घटना सीसीटीव्हीत कैद, पोलिसांनी आरोपींच्या नांग्या ठेचल्या

● कल्याण , प्रतिनिधी :



कल्याणमध्ये एका सहा महिन्याच्या मुलाची चोरीची घटना समोर आली आहे. या प्रकरणात कल्याणच्या महात्मा फुले पोलिसांनी सीसीटीव्हीच्या साहाय्याने दोन आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत. दिनेश सरोज आणि अंकीत प्रजापती असे या दोन्ही आरोपींची नावे आहेत. या दोघांनी फुटपाथवरून सहा महिन्याच्या बाळाची चोरी का केली? याबाबतचा तपास पोलिसांनी सुरू केला आहे. दिनेश हा रिक्षा चालक आहे तर अंकित त्याच्या मेहुना आहे. विशेष म्हणजे कल्याण रेल्वे स्टेशन परिसरात अशाप्रकारे बाळ चोरी होण्याची ही पहिली वेळ नाही. याआधीदेखील असा प्रकार समोर आला आहे. पण पोलिसांनी नेहमी बाळ शोधण्याची कर्तबगारी करून दाखवली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कल्याण पश्चिमेत केडीएमसी बस स्टॉप शेजारी फुटपाथवर आयेशा समीर शेख नावाची महिला 6 महिन्याच्या बाळासोबत झोपली होती. या दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अयोशा यांच्या सहा महिन्याच्या मुलाचं अपहरण केलं. या प्रकरणी आयशा शेख यांनी कल्याणच्या महात्मा फुले पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवून वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली वपोनि शैलेश साळवी यांनी अज्ञात आरोपींचा शोध घेण्यासाठी 3 तपास पथके तयार केले होते.

# मोदी सरकार आणखी एक मास्टर स्ट्रोक मारण्याच्या तयारीत; वाहनधारकांसाठी आनंदाची बातमी

● नवी दिल्ली, प्रतिनिधी :

सत्तास्थापनेनंतर पंतप्रधानपदी असणाऱ्या नरेंद्र मोदी यांनी पहिला निर्णय शेतकऱ्यांच्या दृष्टीनं घेत एका मोठ्या वर्गाला दिलासा दिला. ज्यानंतर आता नव्या निर्णयांच्या दिशेनं मोदी सरकार वाटचाल करताना दिसत आहे. प्राथमिक माहितीनुसार मोदी सरकारच्या या 3.0 टर्ममध्ये वाहनधारकांना मोठा दिलासा मिळणार असून, त्यांचा प्रवास आणखी सुखकर होताना दिसणार आहे.

कोणत्या निर्णयाच्या दिशेनं चाललंय मोदी सरकार?

वाहनांवर फास्टॅगची सुविधा लागू झाल्यानंतर टोलनाक्यांवरील गर्दी आणि वाहनांच्या लांबच लांब रांगा कमी होती अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत होती. पण, प्रत्यक्षात मात्र तसं होऊ शकलेलं नाही. कारण, फास्टॅगची सुविधा असूनही अनेक टोलनाक्यांवर वाहनांना लांब रांगा लावाव्याच लागतात. आता मात्र ही



समस्याही दूर होणार आहे. NHAI च्या वतीनं अशा एका यंत्रणेवर काम सुरु आहे, जिथं तुम्हाला टोलनाक्यांवर अधिक वेळ रांगेत उभं राहावं लागणार नाही. राष्ट्रीय महामार्गावरून ये-जा करणाऱ्या वाहनांना 'बॅरिअर फ्री टोलिंग'चा अनुभव देण्यासाठी आणि टोल वसुलीणध्ये पारदर्शकता आणण्यासाठी म्हणून NHAI कडून जागतिक स्तरावर पावलं उचलली जात आहेत. NHAI शी संलग्न असणारी IHMCL ही कंपनी सध्या काही जागतिक स्तरावरील कंपन्यांना ग्लोबल एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट (EOI) साठी आमंत्रित करताना दिसत आहे. सध्या भारताकडून एका अशा कंपनीचा शोध घेतला जात आहे, जिथं GNSS वर आधारित इलेक्ट्रॉनिक टोल कनेक्शन सिस्टीम सुरु करण्यावर भर दिला जाईल.

टोलनाक्यांवरील अडथळे होणार दूर?

Satellite Based Tolling System यंत्रणा लागू झाल्यानंतर टोलनाक्यावर कोणत्याही पद्धतीचे अडथळे दिसणार नाहीत. येत्या काळात भारतातही स्वयंचलित पद्धतीनं टोलवसुली होणारी यंत्रणा लागू करण्यात येणार असून, ती ग्लोबल नेविगेशन सॅटेलाइट सिस्टम (GNSS) वर आधारित असेल.

### यंत्रणा नेमकं काम कसं करणार?

ग्लोबल नेविगेशन सॅटेलाइट सिस्टम (GNSS)वर आधारित ही यंत्रणा सुरुवातील दोन्ही पद्धतींनी काम करेल. म्हणजेच ज्या वाहनांवर फास्टॅग आहे, तेसुद्धा सुरू राहणार असून, नवी GNSS प्रणालीसुद्धा वापरात आणली जाणार आहे. फक्त GNSS प्रणाली सुरु असणाऱ्या वाहनांनी टोलनाक्यांवरील रांग वेगळी असेल, ज्या वाहनांना टोलवसुलीसाठी रांगेत उभं राहावं लागणार नाहीय. जसजशी टोलवसुलीची ही नवी पद्धत यशस्वीरित्या वापरात आणली जाईल, तसतशी टोलवसुलीची जुनी पद्धत पूर्णपणे संपुष्टात येऊन वाहन धारकांना लांबच लांब रांगांमध्ये उभं राहावं लागणार नाहीय. परिणामी देशाच्या महामार्गावरून सुरु असणारी वाहतूक आणखी चांगल्या पद्धतीनं होणार असून, तुम्ही जितक्या किमी अंतरापर्यंत वाहन चालवलं आहे त्यासाठीचीच टोल रक्कम वसून करण्यात येणार आहे. आहे की नाही ही कमाल बाब?